# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/०२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०५/०२/२००४ रोजी सभा सुचना क्र. ३२, सभा क्र. २, दि. ३१/०१/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी १२.१० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ११) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १२) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |

**मा. सभापती :-**

यापुर्वी सभेमध्ये जे झाले आहे ते सर्व डिलीट करण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मी जे बोललो आणि या सभेमधून सर्व अधिकारी आपली परवानगी न घेता पटापट बाहेर पडलेले आहे. हा स्थायी समितीचा अपमान आहे. त्यांनी सभागृहातुन बाहेर जाताना तुमची परवानगी घेतली का? होय किंवा नाही असे सांगा.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेबांची काही जरूरी नव्हती. मी तुम्हाला पहिले सांगितले होते की, आपण आपला शब्द मागे घ्या. पण तुम्ही तुमचा मागे का घेतला नाही. आपण आपला शब्द मागे घेतला असता तर कोणीही उठून गेले नसते. उपआयुक्त साहेब गेले म्हणून ते उठून गेले.

**मिलन म्हात्रे :-**

या सदनमध्ये जे अधिकारी बसतात. आपण मागे एक नियम केला हेड ऑफ द डिपार्टमेंटच्या व्यतिरिक्त कोणीही बसू नये. त्यानुसार प्रशासनाने नियम केला आणि हेड ऑफ द डिपार्टमेंट बसायला लागले. केळकर साहेबांनी सभा त्याग केला आणि केळकर साहेब म्हणजे संपूर्ण प्रशासन नव्हे. हा जो प्रकार आज घडला आहे तर ह्या सगळया अधिकाऱ्यांनी सभापती साहेबांची परवानगी घेतलेली नव्हती. या सभागृहातुन उठून जाताना त्यांनी परवानगी घेतली का? त्याचे आपण पहिल्यांदा मला येथे उत्तर

द्या. त्यांनी परवानगी घेउन जायला पाहिजे होते. तुम्ही येथले पदसिद्ध अधिकारी आहात. या सभागृहाचा मान सभापती साहेबांचा आहे. आम्ही सुद्धा सभागृहात भाषणाला उठल्यावर आपल्याला आधी अभिवादन करून नंतर मग भाषणाला सुरूवात करतो. ही पद्धती आहे आणि सभाशास्त्र देखील हेच बोलते. मी आरोप केला आहे आपण माझ्याशी बोला काय आहे ते? केळकर साहेबांनी माझ्याशी लढावे. कारण माझ्याकडे काही पुरावे आहेत. सभापती साहेब आपण माझे ऐका माझी आपल्याला विनंती आहे त्यांना एवढे लागले मी दलाल बोलल्यावर. आमच्या सगळया नगरसेवकांना जनता नाक्यानाक्यावर कॉलर पकडून बोलते की, तुम्ही दलाल आहात. काल परवा मारामारी झाली. आयुक्त साहेब होते का, कशासाठी झाले तिथे एखादी दंगल पेटली पाहिजे का?

**मा. सभापती :-**

आजची सभा संपल्यानंतर आपण ह्या चर्चेवर बोलूया.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीमधून कोणताही अधिकारी आपली परवानगी न घेता उठून नाही गेला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकारी सभागृहातच बसून राहायला पाहिजे होते ते बाहेर गेले कसे काय?

**याकुब कुरेशी :-**

हे बघा आता जे काय झाले ते निस्तरा. उगीच प्रकरण वाढवू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, सभेत जे विषयपटलावर विषय आहेत त्या विषयाला आपण सभेला सुरूवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी जे वक्तव्य केले की, गाडी लगेच सोडली. तर ती गाडी कधी सोडली, किती दिवस होती त्याचा सगळा रेकॉर्ड माझ्याकडे आहे. तुम्हाला कुठलीही खोटी माहिति हे देणार. सभागृहापुढे येउन त्याची बाजु क्लिअर करणार तर ह्याचा अर्थ असा होतो की, हे जेवढे सदस्य ऑक्ट्रायच्या विरूद्धात ते सगळे खोटे आहेत आणि आयुक्त साहेबांच्या म्हणण्यानुसार आणि उपआयुक्तांच्या म्हणण्यानुसार ऑक्ट्रायवाल्यांनी जी कार्यवाही केली ती योग्य आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणजे आम्ही खोटे आणि तुम्ही खरे. प्रशासन आणि ऑक्ट्रायवाला. आता जे उपआयुक्त साहेबांनी सांगितले की, गाडी लगेच सोडली ते त्यांचे विधान त्यांनी लगेच मागे घ्यावे. मग मी ही माझे शब्द मागे घ्यायला तयार आहे. त्यांनी जी खोटी माहिति दिली होती ती त्यांनी पहिले मागे घ्यावे आणि ते प्रोसिडिंगमधून काढावे आणि मग मी माझे सुद्धा शब्द काढावे. कोण अधिकारी आहे? ते बाहेर कसे काय गेले. जर उद्या एखाद्या उपआयुक्त साहेबांनी आम्हाला खोटी माहिती दिली आणि आम्ही आरोप केले तर ह्यांचा काय संबंध आहे सगळयांचा बाहेर जाण्याचा. तो अधिकारी बोलेल की, माझ्यावर लावलेले हे आरोप खोटे आहेत हे कागदपत्र आहेत म्हणून. हे अधिकारी पटापट उठून पडतात हा प्रघात चुकीचा पडलेला आहे. उद्या मा. महासभेमधून ही ते निघून जातील. हे सन्मानिय हाउस आहे. माझा अजूनही आरोप आहे की, ती पार्टी मला काल भेटून गेली, सर्व कागदपत्रे दाखवले की साहेब एवढे एवढे दिवस आमची गाडी अडकवलेली आहे. आमच्या वकीलाच्या नोटीसा झाल्या आहेत. तरीसुद्धा गाडी सोडली नाही. ह्याचे पत्र घेउन तो माणूस गेला तर त्यांनी सरळ सांगितले की, हम केळकर साहब का सुननेवाला नही. त्याच्या सहीचे पत्र मी वाचले आहे आणि ते व्यापारी मला येउन भेटले आणि एक आठवडयानंतर त्या पार्टीला ट्रकचे भाडे व त्याच्यानंतर माल उतरवला त्याचे डॅमरेज हे सगळे त्या पार्टीला भरायला लागले. प्लस गर्व्हरमेंटची ऑर्डर त्यामुळे त्याचा तो माल सगळा परत गेला आणि ती गाडी त्याला रिर्टन घेउन जावी लागली आणि ह्यांनी पत्र दिलेले तो माणूस ऐकायला तयार नाही. ॲक्युचल म्हणजे ह्यांनी रागाने उठून त्याच्यावर कारवाई केली पाहिजे होती असे माझे स्वतःचे मत आहे. तो उपआयुक्त साहेबांची सही नाकारतो म्हणजे काय?

**मा. सभापती :-**

उपआयुक्त साहेबांची सही नाकारली. पण तुम्ही आता उपआयुक्त साहेबांना कसे बोलले दलाल. मी सांगतो तुम्हाला, त्यांना अग्रवाल काय बोलले की, मी तुमचा माल घेतो आणि तुम्ही तुमचे पैसे घेउन जा ट्रान्सपोर्टसहित, मग माल का दिला नाही? ह्याचा अर्थ तुम्ही खोटे भाव लावून येतात. मग माल सोडायला सात दिवस का लागले? जर त्यांच्या अंगात भिती नाही. हा विषय मी त्या दिवशी क्लिअर केले आहे. ते जर माल घ्यायला तयार आहे तर माल त्यांना द्या.

**रिटा शाह :-**

साहेब, आपला माल असा कोण कुणाला देणार नाही. त्याला प्रुफ करून द्यायला सांगा माल जास्त आहे तर. हे खोटे आहे. तो माल कसा घेणार?

**मा. सभापती :-**

कसा घेणार म्हणजे तुम्ही त्या भावाने लिहून द्या त्या भावाने तो माल घेणार.

**रिटा शाह :-**

साहेब, तो बोलतो ना एवढा भाव आहे तर मी काय बोलते ते सांगा. सहा हजार आहे तर सहा हजाराचे पन्नास भरायला तयार आहे. फक्त त्याने प्रुफ करून द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

वॅल्युऐशन तो कसा काय करणार?

**रिटा शाह :-**

त्याच्याकडे वॅल्युऐशन नव्हतीच तर तो असा कसा काय कोणाचा माल घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

वॅल्युऐशन कोर्ट करते आणि ते सर्व अधिकारी कोर्टाचे आहेत आणि त्या दिवशी त्याचे सेंट्रल गव्हरमेंटकडून त्यांचा माल आला व त्यांच्याकडे सेंट्रल गर्व्हरमेंटचे पक्के बिल. हा फालतु ठेकेदार अडवितो का तर त्याची आपल्याकडे करोडो अनामत रक्कम आहे म्हणून, व त्याला काय पॉवर आहेत व तो वॅल्युअर आहे तर नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण हा विषय सभेत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्याकडे लायसन्स आहे का, माल वॅल्यु करायचे तर नाही आणि आपल्या ॲग्रीमेंटमध्ये सुद्धा तो मुद्दा नाही आहे. ती गाडी फक्त मॅच होत नव्हते व त्यांनी जो आरोप केला की, सेंट्रल गर्व्हरमेंटचे रेट बरोबर नाही. तर पार्टी काय बोलली आम्ही गर्व्हरमेंटचा हा माल विकत घेतला आहे आणि आमच्याकडे ॲथोंटीकेटेड बिल आहे आणि आता माझी गाडी सोड व नंतर डिसप्युट काय असेलतर माझ्यावर केस कर. मी हे सर्व करायला तयार आहे. हे तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये आहे. तरीसुद्धा त्याने गाडी एवढे दिवस थांबवून ठेवली आणि ह्यांनी सांगितले की, ती गाडी आम्ही लगेच सोडली. माझा हाच एक ऑबजेक्टीव मुद्दा आहे. ह्यांचे पत्र त्यांनी न मानुन सुद्धा हे त्यांची बाजू घेतात. असे मला म्हणायचे आहे. तुमचे पत्र आपण त्याला दिले त्यांने ते डिनाय केले. परत दुसरे पत्र दिले ते सुद्धा तो डिनाय करत होता. मी तेच बोलतो की, तुमच्या सहीचा त्याने मान ठेवायला पाहिजे. म्हणून माझ्या तोंडातुन हे शब्द निघाले.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आता आपण आपले शब्द मागे घ्या.

**नितीन ठाकुर :-**

सभापती साहेब, आपण अग्रवाल ह्यांना बोलावून घ्या आणि त्यांना समज द्या की, आपण आमच्या उपआयुक्त साहेबांचा मानसन्मान ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

गाडी लगेच सोडली ते त्यांनी मागे घ्यावे. मी देखील माझे शब्द मागे घ्यायला तयार आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, सन्मा. मिलनजी म्हात्रे आपण ज्या भावना व्यक्त केल्या, यामध्ये संबंधित जकात आयातिक ह्याचा माल जकात नाक्यावर जवळजवळ चारपाच दिवस उभा होता. मी असे म्हणालो नाही की, गाडी लगेच सोडली. लगेच केव्हा सोडली तर ज्यावेळी माझ्याकडे रिटा शाह मॅडम ह्या तक्रार घेउन आल्यानंतर ती गाडी लगेच सोडली.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण चुकीची माहिति देत आहात. मी पण गरम झाली की काहीही बोलू शकेल. तुम्हाला मिलन म्हात्रे बोलले तर एवढे लागले आणि मी तुम्हाला स्वतः येउन तक्रार केली की, मी अग्रवालला फोन केला होता की, असे असे झाले आहे. तर अग्रवालने मला काय उत्तर दिले की मी त्यांना सांगितले केळकर साहेबांनी तुम्हाला रिटनमध्ये उत्तर दिली आहे तरी पण तुम्ही त्यांचे ऐकत नाही. ते मला काय बोलले की, केळकर साहेबांचे पार्टीशी काय सातगाठ असेल म्हणून त्यांनी रिटनमध्ये दिलेले आहे तुम्ही त्यांना ससपेन्ड करण्याची मागणी करत नाही. हे शब्द मी तुम्हाला

बोलले होती तेव्हा तुम्हाला तो शब्द लागला नाही का? आणि आज मिलन म्हात्रेजींनी दलाल म्हणून बोलले तर तुम्हाला ते लागले.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

मी त्याचाच खुलासा करत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण दिशाभूल करू नका.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

मला सभागृहाची दिशाभूल करायची नाही आणि माझा त्यांच्याशी काही एक वैयक्तिक संबंध नाही.

**रिटा शाह :-**

ससपेन्ड करण्याची मागणी करा असे तो बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

उपआयुक्त म्हणून त्यांच्या वकीलाची नोटीस गाडी रिटर्न केल्याच्या दुसऱ्या दिवशी आले आहे. ती तारीख मी वाचली आणि तुम्ही काय बोलता आता मला पत्र मिळाले आणि तेव्हा मला कळले की, त्याची गाडी रिटर्न केली म्हणून चार दिवसांनी ऐकून घ्या, मी काय बोलतो ते ऐकून घ्या. दुसऱ्या दिवशी त्यांच्या वकीलाची नोटीस तुम्हाला रितसर मिळाली आहे. त्याची तारीख मला माहिती आहे. त्याची झेरॉक्स माझ्याकडे आहे आणि तुम्ही परत सभागृहाला सांगता. मला रिटा शाह आल्यावर कळले. म्हणजे तुम्हाला नोटीस मिळाली नाही, तुमच्याकडे त्याची ॲक्नॉलेजमेंट आहे. त्याच्या वकीलाचे तुम्हाला नोटीस मिळाले आहे. तुम्ही ऑक्ट्रायचे हेड ऑफ द डिपार्टमेंट. ती नोटीस तुमच्याकडे विदीन वन अव्हरमध्ये आली पाहिजे आणि ती तुमच्याकडे आली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

मी ह्या प्रकरणाचा सविस्तर खुलासा करतो तो मला करू द्या. या प्रकरणाची अशी वस्तुस्थिती आहे की, मेसर्स प्रिन्स अशी ती फॅक्टरी आहे आणि त्यांचा माल आपल्याकडे जकात नाक्यावर आला व जकात नाक्यावर आल्यानंतर तो माल किमान तीन चार दिवस होता. त्यानंतर त्यांनी आपल्याकडे एक अर्ज दिला व तो अर्ज दिल्यानंतर तो मला भेटायला आला व भेटायला आल्यानंतर मी त्याला लगेच तसे पत्र दिले की, ह्या किंमतीपेक्षा ही किंमत आम्हाला ह्याच्याकडून आलेली आहे कस्टम विभागाची आणि ही किंमत गृहीत धरून त्या किंमतीवर आधारीत प्रकार संबंधितांकडून आपण वसुल करावी. अशा संमतीचे पत्र दिले. हे पत्र दिल्यानंतर देखील तो माल दोन दिवस होता. त्यानंतर सन्मा. सदस्या रिटा शाह ह्या त्या आयातिकाला घेउन माझ्याकडे आल्या व माझ्याकडे आल्यानंतर मी लगेच रिटा शाह मॅडम समोर त्याला फोन केला होता.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण त्याला फोन केला नाही. तर आपण मला काय बोलले मॅडम बघा मी त्याला लेखी ऑर्डर दिले आहे ऑक्ट्राय घ्यायचे आणि माल परत घेउन जायला देखील तो तयार होता. तरी पण तो माझे ऐकत नाही असे आपण मला उत्तर दिले होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

त्यानंतर त्याला मी दोन तऱ्हेचे पत्र दिले आणि पत्र दिल्यानंतर त्यामध्ये मी जेव्हा त्या जकात अभिकर्त्याबरोबर देखील दुरध्वनीवर बोललो. तर वस्तुस्थिती अशी होती की, जकातीचा जो माल होता, जो जकातपात्र माल आला होता तर त्याचे म्हणणे असे होते की, ही वॅल्यु अंडरएस्टीमेट आहे आणि त्या किंमतीमध्ये त्याने जर ट्रान्सपोर्टेशन आणि इतर खर्च जर त्याने केला तो ऐकून चौदा टक्के पकडून मी स्वतः तो माल घेण्यास तयार आहे. तर त्यावेळी संबंधित आयातिक ह्याने त्याला नकार दिला की, मी हा माल तुला देणार नाही आणि त्यानंतर हा माल दुसऱ्या दिवशी तात्काळ सोडण्यात आला.

**रिटा शाह :-**

साहेब, मला जे बोलले ते समजले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपल्याला जो खुलासा करायचा आहे तो खुलासा पुर्ण झाला असेल तर त्याला तिथे धंदा करायला बसवले नाही.

**रिटा शाह :-**

त्याने नाका सोडायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याला डिसप्युट होता तर त्याने संपर्क कार्यालयात साधून हा डिसप्युटेड अमाउंट त्याने सगळे येथे पाठवायला पाहिजे होते. त्यांचे ते धंदे नाहीत की, कोणाचाही माल विकत घ्यायचा.

**रिटा शाह :-**

साहेब, तुम्ही वॅल्युएशन एक्साईस ड्युटी होती त्याप्रमाणे काढली आणि तो बोलतो जास्त १४ टक्केहोते मग त्यांनी ते प्रुफ करून द्यायला पाहिजे होते की वॅल्युएशन जास्त होते. आम्ही पन्नास हजार भरतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

तो त्याचा लुकआउट नाही. वस्तु घ्यायची नाही घ्यायची, माल घ्यायचा नाही घ्यायचा ते त्याचे लुकआउट नाही आहे.

**रिटा शाह :-**

तो ठेकेदार तिथे धंदा करायला बसला आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही वॅल्युएशन काढायचे असेल तर ते प्रकरण कोर्टात पाठवायचे होते. एवढे मोठे पत्र देखील तुम्हाला पाठविण्याची काही गरज नव्हती. सदर डिसप्युटेड अमाउंट आमच्याकडे जमा करा असे सांगायचे होते आणि हा वाद तुम्ही कोर्टात पाठवायचा होता.

**रिटा शाह :-**

साहेब, तो आपण उपआयुक्त असुनदेखील आपले ऐकत नाही. असे शब्द तुम्ही मला बोलले आहात की, मी पत्र दिलेले आहे आणि तरी तो माझे ऐकत नाही. तुम्ही काय बोललात मी पत्र दिले आहे पण तो माझे ऐकत नाही. तुम्ही लेखी तक्रार करा आणि पोलीस स्टेशनला जा, कोर्टात जा. असे शब्द आपण मला बोलला आहात. मग व्यापारी हेच धंदे करणार का? कोर्टात जाणार आणि पोलीस स्टेशनला जाणार काय?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा॓.) :-**

जो कोणी बाधित व्यक्ती असेल त्याला कोर्टात जाण्याचे भारतीय संविधानाने अधिकार दिलेला आहे.

**रिटा शाह :-**

भारतीय संविधानाने अधिकार दिलेले आहे ते मला ही माहित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पहिला डिसप्युटेड रक्कम येथे जमा झाली पाहीजे. डिपोझिट झाली त्याची पावती घेउन तो कोर्टात जाणार आहे. हे लक्षात घ्या.

**रिटा शाह :-**

कोर्टात कसे जाणार.

**धनराज अग्रवाल :-**

तुमचे ऐकत नाही तर कोर्टात जा असे नाही आहे. तुमचे त्याने ऐकले पाहिजे. तुमचे पत्र गेले की, त्याने तुमचे ऐकलेच पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे, सन्मा. सदस्या रिटाजी शाह, सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवालजी, उपआयुक्त केळकर साहेबांनी या ठिकाणी जो खुलासा केला तर मला असे या ठिकाणी म्हणायचे आहे की, सभापती साहेब, सभागृहाची जी भावना आहे ऑक्ट्राय संदर्भात ती आपल्याला सर्वांना कळालेली आहे, चांगल्या पद्धतीने कळाली आहे. त्यामुळे येथून पुढे आपण सुवर्णमध्य काढा आणि आपली एखादी तक्रार आल्यानंतर त्याची तात्काळ कार्यवाही कशी होईल आणि त्या ठेकेदाराने प्रशासनाचे ऐकले पाहिजे. अशा पद्धतीने काहीतरी सुवर्णमध्य काढा.

**मा. सभापती :-**

सभा संपल्यानंतर आपण आयुक्त साहेब यांच्याकडे जाउन चर्चा करू आणि आता पुढचा विषय चालू करा.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब आपण आता एवढी चर्चा केली, तुमच्याकडे सेंट्रल गव्हरमेंटच्या रेन्टने रितसर पाठवलेले बिल त्याने नाकारले, तुमचे पत्र त्याने नाकारले. पण त्याच ऑक्ट्राय नाक्यावर तिथे दलाल उभे राहतात. व्यवस्थित सेटींग लागते आणि ते मालगाडया बरोबर सुटले जातात. हे मी तुम्हाला उद्या

दाखवून देतो. म्हणजे ते दलाल आणि आपण अधिकृतरित्या पाठवलेले पत्र ह्याच्यात किती तफावत आहे ते आपण बघा. त्या दलालाची जी सेटींग आहे त्याचा माल बरोबर एन्टायर होतात रूममध्ये आपल्याकडे पैसे न भरता ते सेटल होते. त्याच्यातील दोन तीन मॅटरमध्ये मी गेलो होतो तेव्हा मला कळले की, येथे काय खरा प्रकार आहे आणि जसे आसिफ शेख बोलले की, सुर्वणमध्य तर काही सुर्वणमध्य काढायची गरज नाही. सगळया ह्या मुंबई प्रांतिक अधिनियमामध्ये तरतुदी आहे, वेळ आहे, पद्धती आहे आणि पैसे कसे घ्यायचे अशी पद्धत आहे. डिसप्युटेड रक्कम कधी भरायची, ती किती वेळात भरायची, त्याची पावती कशी दिली पाहिजे, हे सगळे ह्याच्यात आहे. त्यानुसारच व्हायला पाहिजे आणि आम्हाला सुर्वणमध्य वगैरे काही नको. तुम्ही त्याला कडक भाषेत पत्र पाठवा. या आठवडयामध्ये तुम्ही त्याला सभेमध्ये बोलवा आणि लेखी स्वरूपामध्ये सर्व द्या नाहीतर आम्ही देतो. सभापती या नात्याने आपण द्यावे असे मला वाटते आणि आमचे आम्ही आपणाला सात दिवसाच्या अगोदर पत्र देतच आहोत. सभागृहामध्ये मी जे बोललो तर त्यात कुठल्याही अधिकाऱ्याचा मला अपमान करावासा वाटत नाही. हे मी आपणाला प्रामाणिकपणे सांगतो कुठेही ड्युप्लीमन्सी नाही. पण ह्याच्यामध्ये आपण जो सबटेंडर नेमतो आपण जो ठेकेदार नेमतो त्याने सगळयात पहिला जसे मी तुम्हाला कालची गोष्ट सांगतो. मला सहज असे डिसप्युट असे आले तर मी म्हटले की, काय आहे ते बघु दे. तर तो मला बोलतो तुम्ही कोण आहात. असे मला विचारतो. तर मी त्याला सांगितले की, मी इथला नगरसेवक आहे. तुमच्याकडे आय कार्ड आहे का? तो सातशे आठशे रूपयेवाला पगारदार नोकर त्याला मी आयकार्ड दाखवले. ठिक आहे. तो व्यवहार आहे. त्याने मागितले पाहिजे आणि मी दाखवले. पण एवढी अरोगनपणे त्याची चर्चा साहेब, परवा रात्री मारामारी झाली, गाडयांवर गाडया सुटत होत्या, पब्लिक जमत होती. ते पाचजण त्या कॅबिनमध्ये धरून मारत होते पब्लिक त्याला. अक्षरशः सगळा ट्रफिक जाम शहरामध्ये साहेब आपल्या महानगरपालिकेचा असा भबरा होत आहे. ह्याचा आपण विचार करा आणि आजच्या सभेत ह्याबाबत सभा आपण कधी लावली ते घोषीत करा. व साहेबांनी जे मघाशी सांगितले ट्रकचे आणि मी ही सांगतो अजुन एकदा त्याने जे सांगितले त्याचा मला विरोध आहे आणि आठवडाभर तो ट्रक उभा राहिला कसा? ज्यादिवशी डिसप्युट तयार झाला तुमच्या कायद्यामध्ये नियम आहे त्याने इन्फोंमेशन द्यायचे आहे की पाच लाखाचा डिसप्युट आहे. ह्या पार्टीला मी पाठवतोय.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, बस झाले. आज गुरूवार आहे उद्या आपण बसु आणि शनिवारी आपण त्याला आपल्या समोर बोलावून घेउ आणि त्याच्यावर निर्णय काय घ्यायचा आहे तो आपण घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

गाडी लगेच सोडले हे चुकीचे आहे आणि मी जे भाष्य सभागृहासमोर केले आहे ते काढावे.

**मा. सभापती :-**

ह्याच्याआधी सभागृहात जी चर्चा झालेली आहे ती सर्व डिलीट करण्यात यावी आणि पुढील विषयावर सभा चालू करावी.

**(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)**

**(प्र. सचिवानीं प्रकरण क्र. २२४ चे वाचन केले.)**

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या माहितीनुसार सभा चालू असताना आपण जे घोषित केले की, सभा सुरू करत आहे. त्यानंतर आपण जे बोलतो हे सगळे त्या इतिवृत्तांत आले पाहिजे असे माझे स्वतः चे मत आहे. सभाशास्त्र ही तेच बोलते असे मला वाटते. परंतु ह्याच्यातला चार नंबरचा हा जो ठराव आहे तर माझ्या माहिती नुसार चार नंबरला फायर ब्रिगेडच्या येथे काही लोकांना रूम बनवून द्यायच्या होत्या. तो विषय आपण स्थगित करून त्याच्यावर आपण इमारती वगैरे बांधून फायर ब्रिगेडच्या लोकांना त्यांना ही ती जागा उपलब्ध करायची आणि त्या कर्मचाऱ्यांना सुद्धा उपलब्ध करायची असे आपले ठरले. पण एक आठवडयापुर्वी त्याच कर्मचाऱ्यांना रुम बांधून देण्याकरिता टेंडर निघाले. ही गोष्ट खरी आहे का खोटी आहे ते आपण बघा.

**मा. सभापती :-**

वर जे दोन एस्ट्रा रूम होणार आहेत तिथे आपण त्या कर्मचाऱ्यांना द्यायचे असे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपली चर्चा निराळी झाली आहे. आपले त्या चर्चेमध्ये असे ठरले की, त्या कर्मचाऱ्यांना जागा द्यायची परंतु ती सगळी स्क्रीम गोडाउन तोडून अख्खी मोठी बिल्डिंग बांधायची आहे.

**मा. सभापती :-**

तसे नाही आपण जेवढे टेंडर पास केले आहे तेवढेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, मी एवढे ही सांगितले की ती जागा वेस्ट जाईल. त्याच्याबाबतीत तळ मजला अधिक दोन मजले बांधले तर आपल्या फायर ब्रिगेडच्या सर्व कर्मचाऱ्यांना निवासाची सोय होईल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा.) :-**

ही इमारत बांधत असताना त्याला ही त्याच्यामध्ये व्यवस्थित ॲडजेस्ट करून घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. पण आता आपण मला सांगा आपण जर टेंडर काढले तर त्या चर्चेमध्ये झाले की, आपल्याला ते गोडाउन तोडून सगळे करायचे आहे. पण ते जर तेवढया पुरते तुम्ही काढले तर ते काम निराळे होणार आणि हे काम परत तसेच राहणार.

**दिपक खांबीत :-**

साहेब, ह्या कामाचे स्टीकअप सरळ होणार.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ह्या कामाचे प्लानिंग काय केले आहे? कारण टेंडर वाचले म्हणून मी विचारले कारण चर्चा काय होते आणि टेंडर काय निघते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा.) :-**

सलग करायचे.

**दिपक खांबीत :-**

सलग तुम्ही बोलल्याप्रमाणे करायचे. बजेट जेवढा होता तेवढा त्याचा हा पार्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आम्ही आपल्याला असे सुचविले होते आपल्याला की, जे प्लींथ येणार ती आपण सगळी एकत्र कॉमन करायची कारण त्या बिल्डिंगला मजबुती आली पाहिजे. माझा सांगायचा दृष्टीकोन तो होता. ह्याच्यात तुमच्याकडून खुलासा आम्हाला असा पाहिजे की, नेमके त्याठिकाणचे कराल आणि बाकीचे बारगळेल असे काय आहे का?

**दिपक खांबीत :-**

ह्या वर्षी बजेटमध्ये तरतुद ठेवली आहे. हे सगळे होणार आणि बाकीचे सर्व प्रोसीजरमध्ये आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याचे डिझाईन वगैरे दाखवा.

**शरद पाटील :-**

पान नं. ८ मध्ये सभापती महोदय, त्या ठेकेदारांना झाडाच्या पिंजऱ्यांना रंग वेगळा देणार होतो त्याच्यावर काय कार्यवाही केली. त्या ठेकेदारांना असे काही सांगितले गेले का?

**गोविंद परब :-**

ठेकेदारांना पिंजऱ्यावर नविन रंग देण्यासाठी त्या टेंडरमध्ये नव्हते. परंतु ती जी पट्टी दिलेली आहे त्याच्यावर वेगवेगळया कलरमध्ये नंबर टाकायच्या सुचना दिल्या आहेत.

**शरद पाटील :-**

चालू केले का टाकायला?

**गोविंद परब :-**

त्यांनी कोणी चालू केलेले नाही. त्यांनी नंबर काउंट करून ठेवले आहे.

**शरद पाटील :-**

नंबर काउंट करायचे आहेच. पण ज्या ठेकेदाराला जो रंग दिला आहे त्याची माहिती आम्हाला द्या. कलर नाही तर पिंजऱ्याला फक्त पट्टी लावायची आहे.

**गोविंद परब :-**

पट्टीवरच रंग लावायचा आहे. समजा भाईंदर वेस्टला सफेद रंगाने लिहिले व ईस्टला पिवळया रंगाने, मिरा रोडला काळा रंग काशी मिराला असे वेगवेगळे रंग द्यायचे.

**शरद पाटील :-**

ज्या कलरने नंबर लिहितील त्या ठेकेदाराचे नाव द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मागे आपण त्यावेळेला संयुक्तपणे फिरायला गेलो होतो, तेव्हा आपल्या महापालिकेच्या पिंज-यावर म्हणजे आपण पिंजरे बसविले, आपण झाडे लावली, माती आपण दिली आणि लोकांनी फक्त खड्डे खणले आणि पाणी टाकले. तर सभापती साहेब, त्या आपल्या असेस्ट म्हणजे आपल्या संपत्तीवर काही शाळांनी तो कार्यक्रम राबविला. त्यांची नावे, महापालिकेचे नाही. त्यांना प्रिन्सीपलला बोलावून त्या सर्व पिंज-यांवर एम.बी.एम.सी. नावे टाकली गेली पाहिजे. हे आपण मागे ठरवले पण त्याचे एम्पिलीमेंटशन काही नाही.

**गोविंद परब :-**

शाळेच्या प्रिन्सींपलला बोलावले होते पण ते आले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण नाव टाकून घ्या पेंट करून तुम्ही त्याला का विचारता? ती महानगरपालिकेचीच संपत्ती आहे. पान नं. ९ वर सभापती महोदय, ह्या संपुर्ण ह्याच्यामध्ये मघाशी मी जे बोललो तर पहिल्या ठरावामध्ये अनुमोदन मी आहे आणि हा ठराव क्र. १७४, १७५ आणि १७६ हे तिन्ही ठराव आता आपल्याला आचारसहिंता लागणार आहे. पुढे टेंडर वगैरे काढायच्या प्रोसिजरला वेळ लागू नये म्हणून मी खास करून त्या नियमाचे वाचन केले आहे आणि ते ठराव वाचून कायम करण्यात आले. असे आपण या सभेमध्ये उल्लेखित केले कारण त्याचे इफेक्ट लवकर मिळावेत. कर्मचा-यांचा ठराव होता, एक वाहन खरेदीचा होता. बाकीचे सगळे जे दोन तीन ठराव आहेत त्याचा इफेक्ट लगेच दुस-या दिवसापासून मिळावा म्हणून या ठरावाचे वाचन करून कायम करण्यात आले. असे आपण सचिव साहेबांकडून त्या ठरावाचे वाचन करून घेतले पण ह्या वाचनाचा कुठेही उल्लेख नाही.

**प्र. सचिव :-**

दिले आहे की, सदर ठराव कायम करण्यात येत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे मांडले आहे म्हात्रे साहेबांनी की, ठराव वाचून कायम करण्यात येत आहे तर असे करता येते का? प्रशासनाने मला हे सांगावे की, हे बरोबर आहे आणि इतिवृत्तांत आले नाही पाहिजे. जर ठराव झाला इतिवृत्तांची जरूरत नाही. हे सभाशास्त्र नियमाप्रमाणे बरोबर आहे ते आपण मला सांगा.

**प्र. सचिव :-**

ठराव वाचून कार्यवाहीकरिता मंजुरी देता येते असे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, केळकर साहेबांनी मा. महासभेमध्ये उत्तर दिले होते की, जिथपर्यंत इतिवृत्तांत देणार नाही तो पर्यंत ठराव तुम्हाला मिळणार नाही. त्याचा आता मला खुलासा पाहिजे.

**मा. सभापती :-**

गेल्या गुरूवारी आपणच ठराव मंजुर केला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, गेल्या सभेचा प्रश्न नाही. एकावेळेला हेच साहेब बोलतात की ठराव मिळणार नाही आणि परत हेच साहेब बोलतात की, ठराव पास झाला. हे कसे होते?

**प्र. सचिव :-**

सभेतील कामकाजाचे इतिवृत्तांत मसुदा पुढील सभेत कायम व्हावा म्हणून सभेच्या निकटच्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तो लवकर महापालिका सचिवामार्फत तो तयार करण्यात येईल. परंतु महापालिकेने घेतलेला कोणताही निर्णय कार्यावृत्त होण्याची वाट न बघितल्याशिवाय त्वरित अंमलात आणायचे असेल तर त्याबाबतीत ज्या सभेत असा निर्णय घेण्यात आला असेल त्यासभेत महापालिका सचिवाकडून असा निर्णय अंतर्भुत असतो आणि ठराव वाचून दाखविण्यात आल्यानंतर तो कायम झाला असे समजण्यात येईल व तो पुढील सभेत कार्यावृत्त कायम होण्यापुर्वी तो अंमलात आणता येईल.

**आसिफ शेख :-**

हे तातडीच्या परिस्थितीत का?

**प्र. सचिव :-**

तातडीच्या परिस्थितीत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे आहे की, ठरावाचे प्रथम वाचन होते आणि त्याचे पुर्नवाचन केले जाते.

**आसिफ शेख :-**

इतिवृत्तांत वाचून कायम केल्यानंतर जी कार्यवाही करायची पद्धत आहे. ती पद्धत अशी वाचून कायम करता येते. आपण ह्याचा खुलासा व्यवस्थित करा.

**प्र. सचिव :-**

ठराव पुन्हा पुर्नवाचन केले जाते तेव्हा तो कायम होतो आणि लगेच कार्यवाही करायला मिळते.

**आसिफ शेख :-**

सर्वसाधारणपणे पद्धत काय असते की, एखादा ठराव आपण एखाद्या सभेत केल्यानंतर पुढच्या सभेत इतिवृत्तांत मंजुर केल्यानंतर तो अंमलात येतो. तेव्हा कार्यवाही प्रत्यक्षात चालू होते. तातडीच्या परिस्थितीत आपण अशी पद्धत अवलंबतो आणि वाचून दाखवतो व कायम करतो.

**मोहन पाटील :-**

ही तातडीची पद्धत नाही आहे. जेव्हा ठराव होतो तेव्हा तो इम्प्लिमेन्टेशन केला जातो आणि जे इतिवृत्तांत असते आणि त्या इतिवृत्तांतामध्ये ठरावामध्ये काही शब्दरचना चुकली असेल, तर आपण इतिवृत्तांमध्ये सुधारणा करतो. येथे तातडीचा प्रश्न नाही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मग ठराव पास कसा झाला?

**मोहन पाटील :-**

ठराव झाल्यानंतर ठराव वाचून पास होतो.

**आसिफ शेख :-**

अग्रवाल साहेबांची जी शंका आहे तर येथून पुढे जे ठराव होतील ते वाचून कायम करून घ्या. इतिवृत्तांत मंजुर करून घेण्याची आवश्यकताच नाही.

**धनराज अग्रवाल :-**

केळकर साहेबांनी मा. महासभेमध्ये सांगितले की, इतिवृत्तांताशिवाय ठराव पास होणार नाही. त्याचा काय अर्थ आहे?

**मोहन पाटील :-**

प्र. सचिवांनी उपविधी वाचून दाखविली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे आणि धनराज अग्रवालजी आपण जो मुद्दा उपस्थित केला त्याच्यामध्ये आपले सभेचे जे कामकाज नियम आहेत त्यातील ९ (ब) सचिवांनी वाचून दाखविले आणि याठिकाणी एखादा ठराव तातडीचा असा उल्लेख नाही ह्याच्यामध्ये परंतु श्री. मिलन म्हात्रे यांची त्यावेळेस अशी शंका होती की, ही जी निवडणूक आचार सहिंता लगेच लागण्याची शक्यता आहे. म्हणून यामध्ये हे काम तात्काळ ठराव सचिवांनी वाचून ते कायम करावे. त्यानुसार ते त्यावेळेस सभागृहामध्ये वाचण्यात आले आणि तो सभागृहामध्ये त्यावेळेसच कायम करण्यात आला आणि तशी तरतुद ९ (ब) मध्ये सभेचे कामकाज नियमामध्ये आहे.

**आसिफ शेख :-**

म्हणजे तो प्रसंग तातडीचाच झाला. निवडणूक तोंडावर आलेले आहेत. साहेब, आमच्या शंकेचे निरसन झाले पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपल्याला वाटेल की, ह्या ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन होणे जरूरीचे आहे.

**मा. सभापती :-**

गेल्या गुरूवारी सांगितले आहे ना की, आठ दिवसाच्या आतमध्ये इम्प्लिमेंट होईल.

**आसिफ शेख :-**

आपण ह्याच्यावर कायदेशीर खुलासा व्यवस्थित करा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, कोर्ट मॅटरचा ठराव होता हायकोर्टाचा तर आपण त्याच्यात काय ठरवले की, त्यांना कोर्टामध्ये हा ठराव लगेच आपल्या वकीलांकडे पाठवून ती केस नगरपालिकेने, महानगरपालिकेने मागे घ्यायची. ह्याच्यामध्ये तो उल्लेख नसल्या कारणाने त्याचा किती भयंकर परिणाम होतो. जर समजा त्यांनी असाचा असा सर्टीफाय कॉपी नेउन त्यांनी तो ठराव कॉपी दिली आणि ती पुढे कोर्टात लागेल. तिथे मुद्दा असा उपस्थित होतो की, हे ठराव वाचून कायम केले हे नाही आहे. त्यामुळे हा

ठराव इनफोर्समध्ये नाही. ह्याच्यामध्ये आपण फक्त एक छोटी लाईन टाकायची होती की, ठराव वाचून कायम केला. कृपा करून आपण परत ह्याच्यामध्ये अशा चुका करू नका. ही ग्रॅम्यॉटिकल चुक मानता येणार नाही. त्याकरिता पुर्ण लाईन ह्याच्यामध्ये असू द्या की, हा ठराव कायम करण्यात आला.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठराव वाचून कायम करण्यात आला असे करावे.

**आसिफ शेख :-**

हे जे ब्रम्हास्त्र आहे तर ह्या ब्रम्हास्त्राचा वापर तातडीच्या प्रसंगीच करायचे असते. हा कोर्टाचा मॅटर होता म्हणून आपण ह्याचा वापर, निवडणूका जवळ आल्या म्हणून आपण त्याचा वापर केला. ही पद्धत बघा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, आपण आपला वेळ लक्षात घ्या आपण परत परत त्याच विषयावर चर्चा करत आहोत. आपण सभेचे कामकाज चालू करा.

**शरद पाटील :-**

पान नं. २२ माझ्या संभाषणामध्ये परवाच्या दिवशी असे आले आहे तर ते पुर्वी असा शब्द पाहिजे.

**आसिफ शेख :-**

पान क्र. २३ वर ॲम्ब्युलन्स आणि शववाहिनीचा विषय होता तर आजची शववाहिनीची परिस्थिती काय आहे? मागच्या वेळी ती लोकांना मिळाली नाही तर आतादेखील ती गॅरेजमध्ये आहे का कुठे आहे? ते मिळतच नाही आणि ते विभाग जे आहेत जन्ममृत्यु विभाग हे आपण आरोग्य विभागाला शववाहिनी, रूग्णवाहिनी ट्रान्सफर करू. ते ट्रान्सफर केले की, नाही केले.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

शववाहिनी दुरूस्त झालेली आहे आणि येत्या काही दिवसातच ती आपल्याकडे परत येणार आहे. एल.आय.सी.चे जे प्रिमीयम आहे ते एल.आय.सी.चे अधिकारी ते अद्याप तपासण्याकरिता आलेले नाही. ह्याच्यामध्ये जो ड्रायव्हर होता त्याच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. शववाहिनीचे ॲक्सीडेंट झाल्यानंतर तो ड्रायव्हर त्याच्या गावाला निघून गेला. जो जागेवर उपलब्ध नसल्यामुळे थोडा वेळ झाला आणि कालच आम्हाला त्याचे लायसन्स प्राप्त झालेले आहे व ते लायसन्स आम्ही एल.आय.सी. कडे दिलेले आहे. एल.आय.सी.कडून त्याचे प्रिमियम क्लेम झाल्यानंतर त्याची तपासणी होउन लगेच ती शववाहिनी मिळणार आहे.

**आसिफ शेख :-**

भांडार विभागाकडून ते आरोग्य विभागाकडे ट्रान्सफर करा.

**हॅरल बोर्जीस :-**

एखाद्या वाहन चालकाच्या हलगर्जीपणामुळे गेल्या महिन्याभर ती शववाहिनी गॅरेजमध्ये पडून होती.

**मा. सभापती :-**

त्या वाहन चालकाला डिसमिस करून टाका.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण मागच्यावेळी सांगितले की, एकाला सस्पेन्ड करा. ते नाही झाले आणि आता निर्णय दिला की, डिसमिस करा. जर आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर आपण हा निर्णय देता कशाला? अधिनिर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. आपण घेतलेल्या आदेशाची, निर्देशाची अंमलबजावणी झाली पाहिजे आणि जर ती होत नसेल तर बोलून उपयोग नाही. बोलाचा भात आणि बोलाची कडी असा त्याचा उपयोग होईल.

**मा. सभापती :-**

तुम्ही जर सहकार्य केले तर तुमच्या सहकार्याने आपण सर्वांना काढू शकतो. जसे त्याला चार महिन्यासाठी डिसमिस करा, आठवडयासाठी डिसमिस करा किंवा त्याला कायमचे डिसमिस करा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण हा जो डिसमिस शब्द वापरला त्याच्यामागे त्या केसची पुर्णपणे पार्श्वभुमी ऐकून घ्या. ज्या दिवशी नाशिक मार्गावर ह्या शववाहिनीचे ॲक्सीडेंट झाले. त्यावेळेला आपल्या ड्रायव्हरकडे त्या गाडीचे चालवण्याचा परवाना नव्हता. लायसन्स नव्हते. ॲक्सीडेंट झाले आणि केस जेव्हा गॅरेजला गेली व इन्शुरन्स क्लेम आला, त्यावेळेला तो क्लेम क्लिअर करण्याकरिता

ड्रायव्हरचे लायसन्स लागते. लायसन्स असल्याशिवाय क्लेम पास होत नाही. हे आपल्या सगळयांना माहिती आहे. असे असताना तो गावी गेला दुसरे लायसन्स काढायला आणि म्हणून ह्या सगळया ह्याच्यात दिड महिना आपली शववाहिनी बंद आहे. आपण मला सांगा ज्याच्याकडे लायसन्स नाही त्याच्याकडे आपण गाडी देतो कशी? म्हणजे पहिला ज्यांनी चार्ज दिला त्या ड्रायव्हरला की, तु येथे या गाडीवर बस. तो माणूस कोण? त्याला आपणाला पहिल्यांदा डिसमिस करायला लागेल.

**मा. सभापती :-**

ज्या कॉन्ट्रक्टबेसवर असेल त्याचे आपण पहिल्यांदा कॉन्ट्रक्ट कॅन्सल करा असे मी तुम्हाला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

तो आपल्या नगरपालिकेचा परमनन्ट ड्रायव्हर आहे.

**मा. सभापती :-**

विदाउट लायसन्सवाला आहे त्याला कोणी ठेवला?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या शववाहिनीवर त्याला कोणी चार्ज दिला? तो अधिकारी कोण आहे त्याला आपण पहिल्यांदा शोधून काढा.

**मा. सभापती :-**

त्याला ही काढायला लावतो.

**मिलन म्हात्रे :-**

विदाउट लायसन्स ठेवले, वाहन विभागाला विचारा. लायसन्स नसलेल्या त्या ड्रायव्हरला गाडीवर बसवले कोणी? आपण मला पहिले त्याचे नाव द्या आणि तेथून सुरूवात करा.

**मा. सभापती :-**

तेथूनच सुरूवात करतो.

**याकुब कुरेशी :-**

ह्या ड्रायव्हरांच्या बाबतीत मी मागच्या सभेत बरेच काही बोललो आहे. सभापती साहेब आपण येथे फक्त बोलता मी करतो.

**मा. सभापती :-**

लॉकरमधून चोरी होते, सामान वगैरे चोरी होतात हे सर्व महानगरपालिकेत काय चालू आहे. वॉचमनला मी बोललो की, तुमचा पगार मिळणार नाही. तो कोणी अधिकारी वगैरे असू दे. तो डब्बा किंवा लाकूड जरी घेउन जात असेल तर त्याच दांडक्याने जर नाही मारले तर तुम्ही लोक मार खाणार. महानगरपालिका तुम्हाला फुकटचा पगार देत नाही.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, पंधरा दिवस झाले असेल ही जी चर्चा झालेली ड्रायव्हरांच्या बाबतीत.

**मा. सभापती :-**

साहेब, मला आता सांगितले की, आप यह कंपाउन्ड वॉल लंबा करो इधरसे सबलोग सामान बाजू मे फेकते है और फिर रातको उठाकर ले जाते है।

**याकुब कुरेशी :-**

हे आपल्याला नविन बजेटमध्ये घ्यायला लागेल.

**मोहन पाटील :-**

आता आपण ज्या ड्रायव्हरबद्दल चर्चा केली व त्यांना ससपेन्ड करण्याचे सांगितले, आपण त्या प्रकरणांवर इन्क्वॉयरी चौकशी लावा आणि तो विषय धसाला लावून टाका. असा विषय होणार नाही. तुम्ही बोललात ते बरोबर आहे. पण आता जर जबाबदार व्यक्ती ॲम्ब्युलन्स किंवा शववाहिनी ही अत्यावश्यक बाब आहे आणि अत्यावश्यक सोयी असल्याने ती परिपुर्ण महानगरपालिका देउ शकत नाही आणि हलगर्जीपणा होत असेल तर आपण जे बोललेलो इम्प्लिमेन्टेशन झाले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून आपण नियमाने त्याला कमी करण्याच्या दृष्टीकोनातून चौकशी समिती नेमून टाका.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, सदर वाहन चालकाची सखोल चौकशी करून त्याला त्वरीत निलंबन करण्याचे आदेश जर तो दोषी असेल तर त्याला त्वरीत निलंबित करण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महादेय, केळकर साहेबांनी जोरात तावातावाने सांगितले होते की, तो बोनी का कोण आहे त्याला निलंबित करून टाकेल. हे इतिवृत्तांतामध्ये आले आहे. त्याच्यामध्ये काय झाले, आपण स्वतः येउन आदेश दिले होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, त्यावेळेस मी त्यानंतर सभा संपल्यानंतर लगेच सर्व ड्रायव्हर आणि वाहन विभागाची मी लगेच सभा घेतली आणि त्यासभेमध्ये आमच्या असे निर्दशनास आले की, वाहन विभागाकडे आर्थिक तरतुद अत्यल्प आहे आणि वाहन विभागाकडून मोठयाप्रमाणात जी आर्थिक तरतुदीची पेक्षा जास्त खर्च केला आणि त्या खर्चाचा आम्ही जो गोषवारा काढला. त्यानंतर त्यामध्ये असे निर्दशनास आले की, वाहन विभागाकडे कोणत्याही त-हेची आर्थिक तरतुद नाही आहे. अशा स्थितीत वाहन विभागाचे अनेक ठिकाणी पेट्रोल पंपवाल्याचे बिल देणे बाकी होते. त्यावेळेस मी चौकशी केली की, हे बिल का दिलेले नाही. बजेटमध्ये प्रोव्हीजन नव्हते. विशेषतः म्हणजे आरोग्य विभागाकडे मोठया प्रमाणात आमच्या वाहन विभागाचा खर्च डायव्हर्ट करण्यात आला. म्हणजे त्या वाहनांवर जास्त खर्च झाला आणि त्यामुळे आमच्या वाहन विभागातील खर्च खर्ची पडला आणि त्यानंतर एकंदरीत ही परिस्थिती झाली आमच्या वाहन विभागाची की, त्यामध्ये ती आर्थिक तरतुद नसल्यामुळे अनेक कामे वाहन विभागाची प्रलंबित राहिली आणि त्यावेळेस माझ्या असे निर्दशनास आले, सर्वांशी चर्चा केल्यानंतर याला बोनी जबाबदार नाही आहे. दोष आपण जेव्हा दिला तर बोनी त्यासाठी जबाबदार नसुन त्याची आर्थिक तरतुद अत्यल्प होती. अनेक ठेकेदाराचे बिल बाकी होते त्या ठेकेदारांना सुद्धा मी बोलावले की, तुमचे बिल किती वर्षापासुन केव्हापासून प्रलंबित आहेत. त्यांनी स्वतः गाडया आपल्याकडे ठेवून घेतल्या त्या व्यापा-याने की, आम्ही जो पर्यंत तुमच्या गाडया सोडत नाही तो पर्यंत देत नाही. त्यावेळी अकाउंटला सुद्धा बोलावले व त्यांच्याशीही चर्चा केली आणि त्यांनी हे आर्थिक तरतुदीचे कारण दाखविले. त्यानंतर आपण गेल्या अर्थसंकल्पात त्रैमासिक अहवाल जेव्हा सादर केला आणि त्यामध्ये आपण वाहन विभागाकडे काही रक्कम डायव्हर्ट केले आणि काही खर्च आम्ही वाहन विभागाला, आरोग्य विभागालासुद्धा यामध्ये केला आणि त्यानंतर आता जवळजवळ सर्वांची प्रदान ब-याच ठेकेदाराची प्रदान पुर्ण झालेली आहेत. ह्यानंतर आजच्या तारखेला तशी अवस्था नाही आहे. बरेच वाहन आता सुरू झालेले आहे. सर्व वाहनांचे सर्व्हिसिंगचे टेंडर आम्ही काढलेले आहे. कारण की ह्यापुर्वी कोणत्याही वाहनाचे सर्व्हिसिंग वेळेच्यावेळी होत नव्हती. सर्व्हिसिंग किंवा त्याचे ग्रेसींग जर वेळेच्यावेळी झाले तर त्यावर एवढा खर्च पडत नाही आणि त्या दृष्टीने आम्ही कार्यवाही केलेली आहे. ह्या सर्वामध्ये चौकशी केल्यानंतर बोनी हा त्यामध्ये दोषी आढळला नाही. त्यामध्ये आर्थिक तरतुदीचे कारण मला दिसून आले आणि त्यानंतर बोनी ह्याला मी अगोदर शोकॉज नोटीस दिली आणि त्याच्यावर कार्यवाही सुद्धा प्रस्तावित केली होती. परंतु त्यामध्ये सर्व परिस्थितीचा विचार केला असता बोनी हा दोषी आढळला नाही. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण आता एवढा हा खुलासा केला आरोग्य खात्याने वाहन विभागाची रक्कम वळवून घेतली. त्याला कुठल्या तारखेला स्थायी समितीने रि-ॲप्रोपेशनची परमीशन दिली. स्थायी समितीने परमीशन दिली होती का, की वाहन विभागाचे दहा लाख रूपये, पन्नास लाख रूपये किंवा एक करोड रूपये वाहन विभागाचे आरोग्य विभागासाठी खर्च करायला आम्ही अनुमती देतो. हा प्रस्ताव आरोग्य विभागाकडून आपल्याकडे आला होता का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आरोग्य विभागकरिता नाही तर जी वाहने आहेत तर त्या वाहनांचे सेंट्रलायझेशन वाहन विभागाकडे.

**मिलन म्हात्रे :-**

मला महानगरपालिकेने लेखी दिलेले आहे की, रूग्णवाहिका हे आरोग्य विभागाकडे नाही. हे माझ्याकडे लेखी आहे. आपण मागच्या वेळेचे प्रोसिडिंग वाचा की, या महानगरपालिकेत आरोग्य विभागाकडे कुठची कुठची वाहने आहेत आणि वाहन विभागाकडे कुठची कुठची वाहने आहेत. त्याचा पहिला सोक्षमोक्ष लावा. माझे हे स्टेटमेंट मागच्या प्रोसिडिंगला असेल. त्यावेळेला सांगितले गेले आणि मी सांगितले तेव्हा ही रूग्णवाहिका, शववाहिका आरोग्य विभागाकडे ट्रान्सफर करा. मला तुमच्याकडून उत्तर आहे की, हे वाहन आमच्या विभागात नाही. आरोग्य विभागामध्ये ही वाहने नाहीत. मग त्याच तरतुद तुम्ही आरोग्य विभागाकडे कशी काय केली? ती तुमच्या वाहन विभागाकडेच राहिली पाहिजे.

**मा. सभापती :-**

हे सेंट्रलाईझ होते.

**मिलन म्हात्रे :-**

हे सेंट्रलाईझ नाही आहे. त्यांनी उत्तर दिले आहे की, ही ॲम्ब्युलन्स आमच्याकडे नाही. सदर विचारणा आपण वाहन विभागाकडे करावी असे उत्तर असताना तो खर्च तिथे कसा काय गेला? तो खर्च वाहन विभागाकडेच गेला पाहिजे. त्याबद्दल वाहन विभाग आणि आरोग्य विभागाने खुलासा करावा.

**रिटा शाह :-**

कुठलाही ड्रायव्हर किंवा कुठलाही क्लार्क कोणाच्या आदेशावर जातो. केव्हा केव्हा कुठल्या नगरसेवकाच्या तातडीने कारण ही जी हर्स गाडी आहे. ती डेडबॉडी आणायची आणि घेउन जाण्याचे काम करते. त्याच्यावर काहीतरी इम्पॉरटंट असेल म्हणून त्याने कोणाच्या प्रेशरवर, कोणाच्या आदेशावर तो गेला असेल. माझे बोलणे असे नाही की, ह्याला सस्पेन्ड करा किंवा करू नका. पण ही गोष्ट अशी आहे की, सस्पेन्ड करण्याचा अधिकार स्थायी समितीला किंवा स्थायी समितीच्या सभापतीला आहेत का? दुसरी गोष्ट ड्रायव्हरला सस्पेन्ड करणार तर आदेश देणाऱ्याला ससपेन्ड करा. आदेश देणाऱ्याला सस्पेन्ड करणार का? कोणाच्यामुळे आपण ती गाडी कुठे पाठविली. ती चौकशी करा. चौकशी केल्याशिवाय आणि रिझॅल्ट समोर आल्याशिवाय कोणालाही सस्पेन्ड करू नका. सस्पेन्ड करायला पाहिजे. पण पहिले तुम्ही चौकशी करून त्याचा रिपोर्ट सादर करा. एखाद्या गरिब माणसाला डायरेक्ट सस्पेन्ड करा असे मला बरोबर वाटत नाही. कारण करोडो रूपयाचा भ्रष्टाचार होतो. सर्व काय ते होते आणि आपण फक्त ती गाडी गॅरेजला आहे व ती गाडी दोन महिने भेटली नाही. म्हणून एखाद्या माणसाला सस्पेन्ड करायचे हे मला बरोबर वाटत नाही. आपण त्याची संपुर्ण चौकशी करा आणि त्याच्यामध्ये जो आढळेल, आदेश देणारा असेल किंवा कोण पॉलीटिकल असेल तर तुम्ही काय कार्यवाही करू शकत असाल तर तुम्ही ती करा.

**मा. सभापती :-**

चौकशी करण्याची मला जरूरत नाही. माझा आदेश हा नेहमी पक्का असणार. माझा निर्णय हा पक्का असणार. जे मला वाटते ते मी करत राहणार तुमच्या सहमताने.

**आसिफ शेख :-**

आमचे सहकार्य पहिल्यापासूनच आहे. आपण जेव्हा चार्ज घेतला तेव्हा पासून आमचे सहकार्य तुम्हाला आहे. आपण नेहमी चांगले काम करा.

**मा. सभापती :-**

तुमचे मला सहकार्य आहे का, नाही. ते आपण मला सांगा.

**आसिफ शेख :-**

चांगले काम करण्यासाठी आमचे तुम्हाला नेहमी सहकार्य आहे. अगदी ह्या ठिकाणी जसे सांगितले की, वाहन विभागाकडे अजून वर्ग केला नाही तर ते वर्ग करण्यात आले का?

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, आपले जे वाहन चालक आहेत. ते गाडीमध्ये सभापती किंवा अधिकारी वर्ग नसताना ही ए.सी. मधून फिरतात. आपण त्यांच्यावर लक्ष घाला.

**मा. सभापती :-**

गाडीमधून पेट्रोल काढतात हे आता मला माहिती पडले आणि ही महानगरपालिका करते काय? व हे वॉचमन करतात काय, त्यांना आपण कसला पगार देतो? येथे किती सामान जप्ती केली जातात त्याचा मला रिपोर्ट पाहिजे व त्याचा दंड किती झाला ह्याचा मी पुर्ण हिशोब त्यांच्याकडून घेणार.

**आसिफ शेख :-**

आपण एक चौकशी समिती नेमा आणि त्याचे अध्यक्ष आपण रहा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, आपले विषय बाजूला राहतात आणि प्रत्येक वेळी काहीतरी वेगवेगळे विषय येतात आणि विषयाचे विषयांतर होते.

**आसिफ शेख :-**

आपण असे बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, परत एकदा सांगतो दोन ॲम्ब्युलन्स आणि शववाहिनी ह्याचा रितसर ताबा कुणाकडे आहे हे आपण मला यासभेत डिक्लर करा. त्यावेळेला सुद्धा आपण सांगितलेले नाही.

ड्रायव्हर, क्लिनर कोण आणि त्या गाड्या कुणाच्या ताब्यात आहे. आम्हाला फक्त ह्याचे त्याचे आश्वासन नको आहे. उपआयुक्त म्हणून आपण ह्याचा निर्णय द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे सर्व गाड्या ज्या ज्या विभागाच्या असल्या तरीदेखील त्याचे सेंट्रलाईजेशन वाहन विभागाकडे आहे. वाहन विभाग त्याच्यावर दुरूस्ती करणे, त्याच्यावर खर्च करणे, त्याची जी बिल येतात ते सर्व बिल पाहणे वाहन विभागाचे काम आहे. रूग्णवाहिका आणि वाहन विभागाची इतर वाहने ट्रक वगैरे ही जरी आरोग्य विभागाकडे असली. तरी त्या आरोग्य विभागाकडून किती किलोमीटर चालले, त्याची परिस्थिती काय आहे. हे सर्व बघण्याचे काम वाहन विभागाचे आहे आणि ही वाहने दुरूस्तीसाठी आणि मेनटेनन्ससाठी फक्त वाहन विभागाकडे येणार आणि बाकी दैनंदिन व्यवस्थापन त्या त्याविभागाचे त्या विभागावर राहणार.

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण जो खुलासा केला मग त्याच्या अगोदरची रक्कम तिथे आरोग्य विभागाकडे वर्ग का केली गेली? आता म्हणता की, सगळा खर्च त्या डिपार्टमेंटचे वाहन विभाग करतात. तुमचेच स्टेटमेंट दहा मिनिटापुर्वीचे ते होते.

**आसिफ शेख :-**

मागच्या सभेत आपले ठरले आहे की, आरोग्याचे शववाहिनीका, रुग्णवाहिका, जन्ममृत्यु विभाग जे आहे ते आरोग्य विभागाकडे वर्ग करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

आता येणाऱ्या बजेटमध्ये आपण तरतुद केलेली आहे. गेल्या बजेटमध्ये काय झाले होते वाहन विभागाकडे आपण अत्यल्प खर्च दाखविला होता आणि ह्या वेळेस आपण विभागाकडून नवीन गाडी खरेदी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कमी अत्यल्प असूनही ते तिथे कसे काय गेले? ती रक्कम येथेच राहिली पाहिजे. ती तरतुद गेली कशी काय, कुठल्या कारणाने गेली? आधीच तरतुद कमी त्यात डिपार्टमेंटकडे वाहनांना चार्ज नाही.

**मोहन पाटील :-**

इतिवृत्तांताला मंजुरी देत आहे असा ठराव मी मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, ही जर मिटींगची अशी पद्धत असेल तर आम्हाला येथे बसण्याची गरज नाही.

**मोहन पाटील :-**

इतिवृत्तांताचा ठराव दिनेश नलावडेजी हे मांडत आहे. इतिवृत्तांत मंजुरीकरिता त्यांचे नाव घेण्यात यावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

महानगरपालिका आयुक्त हे महानगरपालिका गाड्याचे मालक आहेत आणि जी सविस्तर माहिती जी आहे. तर ह्यामध्ये जी आर्थिक तरतुद होती ती वाहन विभागाकडे कमी होती. त्यामुळे आरोग्य विभागाकडे अशी आर्थिक तरतुद होती गाडया दुरूस्तीसाठी त्यामुळे हा खर्च आपण केलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मालक महापालिकाच राहणार ना.

**दिनेश नलावडे :-**

प्रकरण क्र. २२४ दिनांक ८/१/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करण्याचा विषय आलेला आहे आणि ह्या इतिवृत्तांतास दुरूस्तीसह मंजुरीचा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

पान क्र. ३७ आणि ३८ वर जे डॉक्टरर्स वगैरे आपण घेतलेले आहे. ते फक्त आपल्याला रोष्टर पद्धतीने घेण्याचा अधिकार आहे. ते इन्क्वायरी करून तो विषय मंजुर करा नाहीतर अशा पद्धतीने आपण घेउ शकत नाही. कारण इतर स्टाफ हा आपण सेवानियोजन कार्यालय ह्यांच्याकडून घेतला आहे.

**मा. सभापती :-**

हे मंजुर झाले. आता आपण काय करू शकत नाही.

**रिटा शाह :-**

घेउ शकत नाही, आपल्याला अधिकार नाही तर तुम्ही ते कसे घेणार? दुरूस्ती मांडा.

**मा. सभापती :-**

दुरुस्ती म्हणून घेउ शकतो.

**रिटा शाह :-**

मी दुरूस्तीच बोलत आहे और अधिकार नही है तो अपने आप ही कॅन्सल हो जाएगा ।

**आसिफ शेख :-**

डॉक्टर साहेब आपण बोला.

**रिटा शाह :-**

दुरूस्ती म्हणजे आपण जे डॉक्टर वगैरे घेतलेले आहे. ते आपल्याला रोस्टर पद्धतीने घेण्याचा अधिकार आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, ह्याच्यामध्ये फक्त छोटी दुरूस्ती करावी पान नं. ३५ भाईंदर पश्चिमेला आपले एकूण तीन ओ.पी.डी सेंटर झाली आहेत. तर माझी आपल्याला अशी रिक्कवेस्ट आहे ही जी येथे आहे ती २ आणि २ (अ) करा म्हणजे ती त्याच्यामध्ये तीन होतील.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, आपण आरोग्य केंद्राचा ठराव करताना भाईंदर पश्चिमेला दोन, पुर्वेला दोन, काशी मिरा एक, मिरा रोड एक आणि उत्तन एक असे सात आरोग्य केंद्र आणि एक फिरता दवाखान्याचे आपण ठराव केलेला आहे. आपण भाईंदर पश्चिमेला २६ जानेवारीला जुन्या कार्यालयामध्ये एक आरोग्य केंद्र यापुर्वीच चालू केलेले आहे आणि एका आरोग्य केंद्राचे आपण काल उद्घाटन केलेले आहे. आपल्या विभागामध्ये आरोग्य केंद्र दोन नाही तर एकच आहे. ओ.पी.डी. आपण दोन ठिकाणी चालवणार आहोत. लोकांच्या नागरिकांच्या सोयीसाठी आपण ही व्यवस्था केलेली आहे. आपण ओ.पी.डी. चालवणार आहोत परंतु आरोग्य केंद्र एकच राहणार आहे. आरोग्य केंद्रासाठी पन्नास हजाराची लोकसंख्या असणे आवश्यक असते. झोपडपट्टीचा विस्तार आणि दोन झोपडपट्ट्या वेगवेगळ्या तिथे होत्या तिथे गरज होती. एमनाएशन आम्ही सर्वे घेतला त्या ठिकाणी एमनाएशन किंवा इतर ज्यागोष्टी अत्यंत कमी होत्या म्हणून आपण निर्णय घेतला. आपल्याशी विचारविनिमय करून तो निर्णय झालेला आहे की, दोन्ही ठिकाणी आपण दवाखाना चालूया. परंतु आरोग्य केंद्र एकच राहिल. पुढे जर आपल्याला आणखीन पदे निर्माण करण्यात आली मा. महासभेच्या मंजुरीने बजेट जर आपले तसे असले तर आपल्याला ते आणखीन वाढवता येईल. मा. स्थायी समितीच्या निर्दशनास मी आणू इच्छितो की, मी मागच्या महिन्यामध्ये अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा ह्यांच्याकडे बैठकीसाठी गेलो होतो. त्याठिकाणी विषय काढला आणि आमच्याकडे शासनाची कुठलीही मदत मिळत नाही, आरोग्य सेवेसाठी शासनाने मदत करावी अशी त्यांना विनंती केली आणि त्याचवेळेला आमचे आर.सी.एच. रि-प्रॉडेक्टीव्ह माता बालसंगोपन किंवा रि-प्रॉडेक्टीव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ यावर आमची बैठक चालू होती आणि यामध्ये आर.सी.एच.चा फेस दोनमध्ये केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाला काही मदत मिळणार आहे आणि ती मदत आम्हाला द्यावी. अशी त्यांना विनंती केली ती त्यांनी प्रिन्सीपली मान्य केली आणि प्रस्ताव आम्हाला सगळयांना ३१ जानेवारी पर्यंत प्रस्ताव सादर करायला सांगितले होते त्यानुसार मी प्रस्ताव सादर केले आहे. एकूण जवळजवळ अकरा कोटी ऐकाहत्तर लाख रूपयाचा पाच वर्षाचा हा कार्यक्रम मी सादर केलेला आहे आणि प्रिन्सीपली शासनाने अतिरिक्त संचालकाने मान्य केलेले आहे की, तुम्हाला ह्या प्रोग्राममध्ये आम्ही मान्य करून घेतो. तर या कार्यक्रमामध्ये या कार्यक्रमा अंतर्गत आपल्याला मदत मिळेल आणि एप्रिलपासून आपल्याला ह्या कामाची अंमलबजावणी करावी लागेल. आपण सादर केलेला प्रस्ताव एकूण अकरा कोटी एकाहत्तर लाख रूपयाचा २००४ पासून पाच वर्षाकरिता मी प्रस्ताव दिलेला आहे. तेवढा जरी सॅक्शन नाही झाला किंवा मंजुर झाले नाही तरी बहुतेक पन्नास टक्के रक्कम आपल्याला मंजुर होईल. त्या अंतर्गत आपल्याला काही ठिकाणी सोयीसुविधा उपलब्ध करून देता येईल. मग अशा वेळेला जर तो प्रस्ताव मंजुर झाला तर आपल्याला आपली व्याप्ती वाढवता येईल. आपल्याला त्यामध्ये आणखीन वैद्यकीय अधिकारी मिळतील. स्टाफ मिळणार आहे आणि त्यामधून आपल्याला ह्या सर्व सोयीसुविधा आपल्याला करता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, माझी सुचना अशी आहे की, आपण बाह्य रूग्ण विभागाची नोंद करा.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता डॉक्टर साहेबांनी सांगितले की, दोन झालेले आहे आणि तिसरा प्रस्ताव दिलेला आहे, भाईंदर पश्चिमेमध्ये, विनायक नगर समाज मंदिरामध्ये दवाखाना उघडावा.

**आसिफ शेख :-**

सभापती महोदय, आपण या ठिकाणी जो खुलासा केला भाईंदर पश्चिमेला आपण दोन आरोग्य केंद्रे मंजुर केले आहेत आणि एकूण सात आरोग्य केंद्र आहे व आपण जे पहिले आरोग्य केंद्राचे उद्घाटन केले जे मी, नितीन ठाकूर ह्याच्या प्रभागात जी दोन आरोग्य केंद्र उद्घाटन केलेले आहेत तर त्याला आरोग्य केंद्र म्हणायचे की, उपकेंद्र म्हणायचे. नक्की काय म्हणायचे.

**डॉ. बावस्कर :-**

मी यापुर्वीच स्पष्ट केलेले आहे ते आरोग्य केंद्र एकच आहे आणि त्यापैकी एक उपकेंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. वैद्यकीय अधिकारी एकच राहणार आहे आणि स्टाफ जो आहे त्या ठिकाणी तो एका आरोग्य केंद्राचाच आहे. स्टाफ दोन आरोग्य केंद्राचा राहणार नाही. परंतु झोपडपट्ट्या लांब असल्यामुळे नागरिकांना ते गैरसोयीचे आहे. त्यामुळे आपण त्या ठिकाणी व्यवस्था केलेली आहे आणि स्टाफ हा तेवढाच राहणार आहे आणि आपण फक्त ओ.पी.डी. ची वेळ वेगवेगळी ठेवणार आहोत.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण हा जो विषय लावलेला आहे या ठिकाणी तर मुळात या ठिकाणी आपल्याला अशी केंद्र सुरू करावी म्हणून आपण हा स्टाफ मंजुर केलेला आहे, मागितलेला आहे. मुळात कायद्याला आपण बगल दिलेली आहे. पण आपल्याला कायम स्वरूपी हा स्टाफ ठेवता येणार नाही आहे.

**मा. सभापती :-**

मग आपण ते बंद करून टाकू.

**आसिफ शेख :-**

आपण असे हॉस्पीटल बंद कसे करणार?

**मोहन पाटील :-**

असे कसे बंद करणार?

**मा. सभापती :-**

ते डॉक्टर टेम्पररी आहेत सहा महिन्यासाठी आता असे बोलले तर मग सहा महिन्यानंतर काय करणार?

**आसिफ शेख :-**

ही जी सेवा आहे ती आपण लोकांना डायरेक्ट देतोय आणि लोकांचे आर्शिवाद घेतोय आणि आपण म्हणता बंद करून टाकणार म्हणजे काय?

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुढे हॉस्पीटल चालू करायचे का?

**आसिफ शेख :-**

हॉस्पीटल चालू करायचे आहे तर ते हॉस्पीटल चालू करा आणि हे जे आहे ते राहू दे.

**मा. सभापती :-**

कसे राहू दे. किती खर्च आहे. मग आपण आरोग्याला तेवढया खर्चाची, पैशांची मंजुरी द्या.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपल्या तीव्र भावना आहेत. या शहरामध्ये कोणतीही आरोग्य बोलल्यानंतर गटारे आणि रस्ते साफ करणे पण रस्तेही साफ होत नाही व गटारेही साफ होत नाही. हा विषय बाजूलाच गेला म्हणून या विषयामध्ये आरोग्यामध्ये ही जी वैद्यकीय सेवा आहे. ही असायला पाहिजे. या अनुषंगाने आपण या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये हॉस्पीटलची जागा हस्तांतरीत होत नाही तो पर्यंत एखादे आरोग्य केंद्र सुरू व्हावी आणि आरोग्य केंद्र सुरू झाल्याने हॉस्पीटलवर कोणताही परिणाम होणार नाही आहे आणि आरोग्य केंद्र सुरू होउनही हॉस्पीटल या ठिकाणी होउ शकते.

**मा. सभापती :-**

सुरू झाले तरी आक्षेप करतात आणि नाही सुरू केले तरी आक्षेप करतात.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी कोणी आक्षेप घेतला आहे?

**मा. सभापती :-**

ते सांगतात की, जर दोन दवाखाने याठिकाणी दोन दवाखाने त्याचे काय?

**मोहन पाटील :-**

आपण जर डॉक्टर एवढे मागावलेले आहेत. आपण हा जो निर्णय घेतलेला आहे आणि त्या निर्णयाच्या पलीकडे गेलो तर आपला गोंधळ होणारच आहे. जसे दोन पश्चिमेला पाहिजे, पुर्वेला पाहिजे, एक उत्तनला पाहिजे, एक मिरा रोडला पाहिजे आणि एक काशी मिरा येथे पाहिजे. अशा पद्धतीने सात केंद्र आपण याठिकाणी सुरू करणार आहोत. तर ती सात केंद्र सुरू होउ द्या. विषय असा झाला की, काल दोन केंद्राची उद्‌घाटन झाले आणि डॉक्टर साहेबांनी ते विस्तृत केले की, एका आरोग्य केंद्राचा स्टाफ किती आहे? याची माहिती आपण आम्हाला द्या की, एका आरोग्य केंद्राचा स्टाफ किती राहिल आणि दोन आरोग्य केंद्राचा स्टाफ किती होईल.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, एका आरोग्य केंद्रामध्ये एक वैद्यकीय अधिकारी, एक फॉरमासिस कम क्लार्क, एक एन.एम. आणि तीन एन.ए.एम. हा एवढा स्टाफ एका आरोग्य केंद्राचा आहे आणि काल जे उद्‌घाटन झाले तर त्या विभागामध्ये एवढा स्टाफ राहणार आहे आणि एका आरोग्य केंद्राचाच स्टाफ राहणार आहे. भाईंदर पश्चिमेला जुन्या नगरपालिकेच्या कार्यालयामध्ये जे केले त्याठिकाणी आपण एवढाच स्टाफ ठेवणार आहोत.

**मोहन पाटील :-**

सहा स्टाफमध्ये जेव्हा आपण आरोग्य केंद्र सुरू करणार आणि ते नगरपालिकेच्या जुन्या कार्यालयात सुरू करणार ते बरोबर आहे. सहा स्टाफमध्ये आपण विचार केला की, ते आरोग्य केंद्र कुठे आहे? तर स्टेशनजवळ आहे आणि हे आरोग्य केंद्र गणेश देवलमध्ये आले मग तुम्ही त्या सहा स्टाफचे वायग्रिकेशन कसे करणार?

**डॉ. बावस्कर :-**

त्यामध्ये जर आपण शासकीय आरोग्य सेवा विचारात घेतली तर त्यामध्ये अशा वेगवेगळया ठिकाणी उपकेंद्र किंवा सब सेंटर म्हणून असे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किंवा केंद्रामध्ये ते स्थापन करावे लागतात आणि हे एक उपकेंद्र किंवा सबसेंटर म्हणून ते कार्यरत राहिल. त्याठिकाणी आपण जो विभाग वाटून दिलेला असतो कर्मचाऱ्यांना ह्या तीन ए.एन.एम. ज्या असतात त्यांना आपण एरिया वाटून दिलेला असतो. ह्या ही आरोग्य केंद्रामध्ये आपल्याला एखादा उपविभाग काढावा लागणार आहे. आज काशीमिरा विभागामध्ये आपण जो दवाखाना सुरू करणार आहोत, आरोग्य केंद्र सुरू करणार आहोत.

**याकुब कुरेशी :-**

डॉक्टर साहेब आपण माझ्या मते ही माहिती लेखी स्वरूपामध्ये द्यावी.

**डॉ. बावस्कर :-**

ही माहिती मी आपणाला लेखी स्वरूपामध्ये देतो.

**याकुब कुरेशी :-**

आपली आरोग्य केंद्राची प्रोसिजर चालूच आहे. परंतु हॉस्पीटलचे जे प्रोसीजर चालू होते ते कुठेपर्यंत आले. त्याची माहिती दिली तर बरे होईल.

**मोहन पाटील :-**

साहेब, जो मुळ विषय आहे तो बरोबर आहे. सन्मा. सदस्य याकुबजी कुरेशी ह्यांनी बोलले की, आपण हॉस्पीटल सुरू करण्याच्या ह्याने लागलेलो आहोत आणि तुम्ही उद्या बोललात की, येत्या सहा महिन्यामध्ये सुरू झाले पाहिजे. महानगरपालिकेच्या गेल्या काळामध्ये आपण तेच केलेले आहे. परंतु जागा हस्तांतर होत नाही तोपर्यंत होउ शकत नाही आणि जागा आपल्याला विनामुल्य हस्तांतर झाले पाहिजे. आपल्या बाजुच्या नगरपालिकेमध्ये आमदार हितेद्र ठाकूर ह्यांनी एक प्रस्ताव आणला आणि त्यांनी तो प्रशासनाकडून मंजुर करून घेतला. त्यांना विदाउट पैशांनी ती जागा मिळाली आहे आणि आपण ते प्रयत्न करत आहोत आणि आपल्या आरोग्य विभागाने केले काय त्याचा जवाब तुम्ही विचारा. आज प्रयत्न काय केले ते विचारा.

**मा. सभापती :-**

माझी काल चर्चा शेंडे साहेबांबरोबर झाली ते म्हणाले साहेब कुठेही जायला तयार आहोत. आपण म्हणाल त्या ठिकाणी मी यायला तयार आहे आणि उद्या पासून मी डॉक्टरांना देखील घेउन

फिरतो. असे आपण एक महिना अगोदर बोललो होतो जर तुमच्याने होत नसेल तर मी जातो आणि मी जाउन हे करायला तयार आहे.

**याकुब कुरेशी :-**

अध्यक्ष महोदय, हे अधिकारी मंत्र्यांपुढे बोलू शकत नाही. त्याच्यासाठी आपण त्यांच्या जोडीला जायला पाहिजे. असे माझे म्हणणे आहे. जेणेकरून आपण संपुर्ण माहिती त्यांना देउ शकतो आणि ती मंजुरी कुठे अडकली आणि कुठे नाही अडकली ते समजेल.

**मा. सभापती :-**

ती चर्चा केलेली आहे, कुठे अडकली आणि कुठे काय अडकली आहे ते आपण बघूया कसला दाखला मिळत नाही किंवा हॉस्पीटलचे माहिती घेउन बजेटच्यानंतर त्या मार्गाला लागणार आहे. मी, नलावडेजी, वैतीजी किंवा मोहन पाटीलजी किंवा अन्य कोणीही माझ्या सोबत आले तर हरकत नाही. एक-दोन दिवसात आपण तो निर्णय करून घेउ.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब या बाबतीत आपल्याला सदर अधिका-यांनी उत्तर दिले तर बरे होईल. कारण त्याच्यात त्यांना काही अडचणी असतील.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मोहनजी पाटील आपल्याला माहिती आहे की, आपण सातत्याने ह्याचा पाठपुरावा करत आहोत आणि टेम्बा हॉस्पीटल आपल्याला मिळावे, शासनाकडून विनामुल्य मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. गेल्या काही दिवसामध्ये शासनाकडून माहिती मागविलेली आहे आपण सर्व कर्मचा-यांसह घेण्यास तयार आहात का? त्याची सर्व माहिती आस्थापना विभागाकडे केलेली आहे. त्याच्यावर जर सर्व कर्मचा-यांसह हॉस्पीटल ताब्यात घेतले तर आर्थिक भार आपल्यावर किती पडणार ह्याची सविस्तर माहिती पुढील स्थायी समितीसमोर आम्ही लवकर सादर करणार आहोत आणि पुढील स्थायी समितीवर निर्णय घेउन ते मा. महासभेसमोर शिफारस करावे लागणार. कारण हॉस्पीटल जर सर्व कर्मचा-यांसह घ्यायचा असेल तर आर्थिक अधिभार जो येणार आहे. ते स्विकारण्यास मा. महासभेची मंजुरी घ्यावी लागेल.

**आसिफ शेख :-**

आर्थिक अधिभार स्विकारण्याची आवश्यकताच नाही. सभापती साहेबांचे मनोगत आहे आणि सर्वांची फार इच्छा आहे शहरवासियांची या मिरा भाईंदर शहरामध्ये सुंदर चांगले, सुसज्ज असे हॉस्पीटल व्हावे आणि ते आमदार हितेंद्र ठाकूर साहेबांनी जसे विनामुल्य शासनाने दिले असेल तर आपल्याला वेगळा नियम शासन लावणार नाही. त्याच नियमावर आपल्याला ते देणार आहे. आपण देखील विनामुल्यच घेणार आहे. आपण तिथे हॉस्पीटलमध्ये काही धंदा नाही करणार आहोत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी मी स्वतः वसई, विरारमध्ये काम केलेले आहे. शासनाने फक्त आदेश काढलेले आहे. अद्यापही हॉस्पीटल नगरपालिकेच्या ताब्यात गेलेले नाही. शासनाने आदेश काढल्यानंतर जो आर्थिक अधिभार होतो तो आर्थिक अधिभार या नगरपालिका विरार आणि नवघर माणिकपूर नगरपालिका ह्या आर्थिक अधिभार झेपावण्यास तयार आहेत का? तर त्यांनी त्याबाबत नकार दिलेला आहे. त्यामुळे अद्यापपर्यंत ते हॉस्पीटल आदेशप्राप्त होउन सुद्धा त्यांच्याकडे सरेंडर झालेले नाही.

**आसिफ शेख :-**

विनामुल्य जमीन उपलब्ध करण्यासाठी आपण प्रयत्न करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

विनामुल्यामध्ये आपली जागा जी रिझर्वेशनमध्ये आहे ती हस्तांतर करण्यासाठी आपण प्रयत्न करू. कुठलीही जागा घेउन चालू करू.

**प्रकरण क्र. २२४ :-**

दिनांक ०८/०१/२००४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २०५ :-**

दि. ०८/०१/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश द. नलावडे.    अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

आचारसंहिता लागणार आहे. ठराव वाचून कायम केला असे घोषित करा.

**मा. सभापती :-**

ठरावाचे पुर्नवाचन करून ठराव कायम करण्यात येत आहे.
(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२५ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

कर वाढवायचे नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण खुलासा करा की, अर्थसंकल्प मा. आयुक्त साहेबांनी नियमाप्रमाणे स्थायी समितीसमोर सादर करायला पाहिजे पण अजून सादर केले नाही. हे असताना देखील वाढ करण्यासाठी आपण सांगितले की, आमची मंजुरी घ्या. म्हणजे हा प्रस्ताव कसा काय आला?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी अनेक नगरसेवकांकडून असे प्रस्ताव आले की, मिरा रोडला अद्यावत असे अग्निशमन केंद्र करावे. नवघरला एक वेगळे असावे, काशी मिराला वेगळे असावे हे सर्व करण्याकरिता पैशाची आवश्यकता आहे. पैसा जर खिशात नसेल तर आपण काय करू शकतो? त्याकरिता आपणाला आर्थिक तरतुद करायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

पैसे आपल्याला पाहिजे, आपल्याला पैशाचे सोंग करता येणार नाही आणि विकास कामे करताना आपल्याला पैसे हे पाहिजेच.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या माहितीप्रमाणे आयुक्त साहेबांना बोलावून घेतले तर बरे होईल.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, आता तुम्ही तीन तास असेच घालविले विषय नसताना आणि विषय आल्यावर तुम्ही वेळ देत नाही हे असे कसे काय?

**मा. सभापती :-**

हा विषय नामंजुर करण्यात येत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हा विषय नामंजुर करता ते बरोबर आहे. पण हा जो गोषवारा दिला आहे की, झाले पाहिजे वगैरे.

**मा. सभापती :-**

तुम्हाला पाहिजे तर तुम्ही करा.

**धनराज अग्रवाल :-**

पाहिजे तसे नाही आहे. नगरपालिका स्थापन होउन १९ वर्ष झाली. पंधरा वर्षापासुन येथे अग्निशमन दल आहे आणि मी देखील सात वर्षापासून नगरसेवक आहे. सभापती महोदय, आपण जो विषय आणलेला आहे, आता या स्थायी समितीमध्ये आणि मागच्या वर्षीपण पाच का सातदा आपण उपकरण आणायला वेगवेगळे पास केलेले प्रस्ताव अजून पर्यंत उपकरण आलेले नाही. तुम्ही नुसते प्रस्ताव पास करून घेता आणि त्याचे इम्पलिमेन्टेशन काही होत नाही म्हणून नुसते लोकांवर, नागरिकांवर अन्याय होतो आणि प्रत्येक वेळेला टॅक्स वाढतो. म्हणून या करवाढीला आमचा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय नामंजुर करण्यात आलेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

२२ तारखेला पोलीस पाटलांनी पालिकेला ॲप्लीकेशन दिले होते. चौक गावामध्ये जफार शेख ह्याने झाडाला आगी लावल्या त्याचे फोटोसहित अर्ज दिला. तो अर्ज २२ जानेवारी दिला आहे परत ३१ तारखेला मी अर्ज दिला आहे की, प्रकरण दडपताहेत म्हणून त्याने जवळजवळ संपुर्ण चौकाचे झाडे त्याने नष्ट करून टाकली आहे. तर त्या झाडाच्या दुश्मनावर काय कार्यवाही केली ते तुम्ही विचारा. त्याच्यावर अजून का कार्यवाही होत नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीस साहेबांनी जी तक्रार केली आहे ती गंभीर अशी तक्रार आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दोनदा सांगितले आम्ही येतो पण तुम्ही का आलात नाही आणि परत तुम्ही जो आरोपी आहे त्याच्याकडेच तुम्ही जाउन आलात.

**मा. सभापती :-**

परब ह्यांना पाठवून चौकशी करतो. तुम्ही तिथे रहा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, चौकशी नाही त्याच्यावर केस बनली पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य आसिफ शेखजी ह्यांनी विषय मांडला, सन्मा. सदस्य म्हात्रेजी ह्यांनी विषय मांडला, सन्मा. सदस्य घोन्सालवीस ह्यांनी विषय मांडला ते सर्व विषय आपण एकत्र घेउन या आणि त्याच्यावर निर्णय लावण्यात यावा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ताबडतोब निर्णय लागला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

जकात संदर्भात तक्रार निवारण समिती स्थापन करायची आहे. अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तो विषय विषयपत्रिकेवर घ्या.

**प्रकरण क्र. २२५ :-**

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १२९ क(१) तसेच ६३(५) अन्वये अग्निशमन सेवेकरिता सामान्य करात वाढ प्रस्तावित करणे.

**ठराव क्र. २०६ :-**

प्रकरण क्रमांक २२५ चा गोषवारा पाहता सदरहू प्रकरण हि स्थायी समिती फेटाळत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे. अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२६ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव नामंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२६ :-**

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८(अ) प्रमाणे शिक्षण उपकर बसविणे बाबत.

**ठराव क्र. २०७ :-**

प्रकरण क्रमांक २२६ चा गोषवारा पाहता सदरहू प्रकरण हि स्थायी समिती फेटाळत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे. अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२७ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

स्थायी समितीमध्ये बजेट या विषयामध्ये मा. आयुक्त आर. डी. शिंदे साहेब उपस्थित झाले आहे. त्याबद्दल स्थायी समितीच्या वतीने मी त्यांचे हार्दिक आभार मानते. ठराव मांडते.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी जो ठराव मांडला त्या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

(मा. आयुक्त सो. यांनी मा. स्थायी समिती सभापती ह्यांना अर्थसंकल्प सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांसमोर सादर केला.)

**मा. आयुक्त सो. :-**

सन्मा. सदस्य त्याचप्रमाणे माझे सर्व सहकारी आज या सभागृहामध्ये सन २००३-०४ चा सुधारित आणि सन २००४-०५ चा मुळ अर्थसंकल्प आपल्या सर्वांच्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे. या अर्थसंकल्पाच्या फक्त ठळक वैशिष्टया बद्दल सन्मा. सदस्यांना मी अवगत करू इच्छितो. या सादरीकरणानंतर आपण सविस्तर जी ह्याच्यावर चर्चा करणार आहात ती चर्चा होईल. जी करवाढ, दरवाढ ह्याच्यामध्ये सुचवलेली आहे. त्यावर सर्व सन्मा. सदस्य चर्चा करतील आणि आपण सर्वानुमते जो अर्थसंकल्प मान्य कराल तो मा. महासभेपुढे सादर केला जाईल आणि मा. महासभेपुढे त्याला अंतिम स्वरूप देण्यात येईल. जो प्रस्ताव मी आपल्या समोर सादर केलेला आहे त्याच्या बाबतीत मी आपल्याला फक्त ठळक वैशिष्टये सांगु इच्छितो. मालमत्ता करातून ३४ कोटी रूपये, जकात करातून ३९.५०, पाण्यावरील करातून १४ कोटी, मनपा शिक्षण करातून पावणे तीन कोटी, जाहिरात करातून ८० लाख, विकास करातून ६ कोटी, बाजार फी तून १ कोटी २० लक्ष, नविन जलजोडणीतून ३ कोटी, रस्ता नुकसान भरपाई २ कोटी ३५ लक्ष आणि शाळा भाडे जर शासनाकडून आले तर ३ कोटी ८६ लक्ष आणि अग्निशमन सेवा कर हा १ कोटी ४२ लक्ष. या अर्थसंकल्पाच्या वैशिष्टयामध्ये एक सगळयात महत्त्वाचे वैशिष्टय असे आहे की, कंपन्यांकडून जे प्रोडक्ट आपल्या शहरात आयात होतात त्याच्यावर मॅक्झीम डिटेल प्राईज प्रत्येक कन्झ्यूमर प्रोटेक्शन ॲक्टप्रमाणे त्याचा एक टॅग लावणे कंपनीवर बंधनकारक असते आणि ही मॅक्झीमम रिटेल प्राईज ठरवत असताना त्याच्यामध्ये सर्वप्रकारचे कर हे जास्तीत जास्त धरून त्याची किंमत त्या कंपनीने ठरविलेली असते. हा मुद्दा विचारात घेउन आपण कंपनीचे जे प्रोडक्ट आहे त्या प्रोडक्टवर चार टक्क्याने ऑक्ट्राय आकारणी करण्याचे ठरविले आहे. ह्याचे कारण असे आहे की, ही आकारणी जर आपण केली नाही. तर ह्याचा फायदा फक्त कंपनीला होतो. ह्याचा फायदा व्यापाऱ्याला होत नाही, ह्याचा फायदा ग्राहकाला होत नाही. एखाद्या प्रोडक्टची किंमत त्याच्यामध्ये जर चार टक्के जकात कर आकारून गृहीत धरली असेल आणि जर महापालिका दोनच टक्के घेत असेल तर दोन टक्के जो लॉस आहे. हा महापालिकेचा लॉस आहे. कारण कंपनीने ते दोन टक्के गृहीत धरलेले आहे. चार टक्के गृहीत धरून ती रक्कम ठरवलेली आहे. त्यामुळे असे जे आयटम्स आहेत तर अशा आयटम्सवर आपण चार टक्के आकारून साधारण सहा कोटी त्या उत्पन्नातून वाढ होईल अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. अग्निशमन सेवा करामध्ये साधारण दोन टक्के इतकी वाढ आम्ही गृहीत धरलेली आहे त्याच्यातून १ कोटी ४१ लाख रूपये उत्पन्न अपेक्षित आहे. शिक्षण कराच्या बाबतीमध्ये शासनाने नविन जे धोरण महापालिकेसाठी ठरविलेले आहे आणि ते पुर्वी पासूनचेच धोरण आहे. नगरपालिका असताना आपल्याला वीस टक्के अनुदान द्यावे लागत होते शिक्षणमंडळाला वेतनापोटी ते आता शासनाने पन्नास टक्के केलेले आहे. त्यामुळे हा तीस टक्क्याचा जो जास्तीचा बोजा आहे आणि जो इतर खर्च या शालेय शिक्षण विभागावरचा आहे. ज्याच्यामध्ये शाळा दुरूस्ती आहे, गणवेश आहे, क्रमिक पुस्तकांचे वाटप आहे आणि इतर जे योजना आहेत त्या सर्व योजनांचा समावेश करून त्याचा खर्च भागविण्यासाठी आपण त्याच्यामध्ये ४ टक्के वाढ प्रस्तावित केलेली आहे आणि पावणे तीन कोटीचे उत्पन्न त्याच्यातुन अपेक्षित धरलेले आहे. त्याच्यानंतर अर्थसंकल्पातील ज्या खर्चाच्या ठळक बाबी आहेत त्याच्यामध्ये भांडवली कामाचे समावेश आपण मुख्यतः केलेले आहे. नविन रस्त्यासाठी १४ कोटीची तरतुद केलेली आहे. यामध्ये मुख्यत्वे विकास योजनेतील जे रस्ते आहेत अशा एकोणीस रस्त्यांची यादी आपल्यापुढे सादर करण्यात आलेली आहे. याचा नकाशा मी तयार करायला सांगितलेला आहे. कदाचित आपली पुढची ज्या वेळेला चर्चा होतील त्यावेळेला आपल्याला एक नकाशा देखील

प्रत्येक सदस्याला द्यावे असे मी नगररचना विभागाला सांगून ठेवलेले आहे. म्हणजे आपल्याला कल्पना येईल की, हे रस्ते नक्की कुठले आहेत आणि त्याची लांबी, रूंदी व इस्टीमेट त्याचे यथाअवकाश केले जाणार आहे. त्यामुळे आजच आपल्याला त्याचा अंदाज येणे कठीण आहे. परंतु साधारण १४ कोटी रूपये तरतुद आपण ठेवलेली आहे. नंतर कर्ज रूपाने आपण ज्यावेळेला निधी उभारू तर तो आणि सध्या उपलब्ध असलेला निधी यामधून आपल्याला हे रस्ते घेता येणे शक्य आहे. दुसरे महत्त्वाचे वैशिष्टये या अर्थसंकल्पात आहे ते नागरी सुविधा केंद्र आणि कार्यालयाचे संगणकीकरण याचे देखील डिटेल्स आपल्याला चर्चेच्या वेळी आमचे विशेष कार्यअधिकारी आपल्याला देतील. त्यासाठी दोन कोटी रूपयाची तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. नागरी सुविधा केंद्राची स्थापना हे एक वैशिष्टय पुर्ण अशाप्रकारचे संकल्प या अर्थसंकल्पामध्ये आपण करत आहोत की, ज्याच्यामध्ये नागरिकांची जी महापालिकेतील जी कामे आहेत तर ती कामे या नागरी सुविधा केंद्राच्या मार्फतच नागरिकांनी करून घ्यावी. अशाप्रकारची कल्पना आहे. आपल्या आजूबाजुंच्या महापालिकांमध्ये अगोदरचा या वर कार्यवाही झालेली आहे. आपण याबाबतीत थोडेसे पाठीमागे पडलेलो आहोत. कल्याण महानगरपालिकेत ही कार्यवाही फार उत्तम रितीने चाललेली आहे. देशपातळीवरही त्याचा गौरव झालेला आहे. भिंवडी, ठाणे, उल्हास महानगरपालिकामध्ये ही केंद्र जवळपास सुरू होण्याच्या अवस्थेमध्ये आहे. आपण आता जर उभे करायला दिले तर येत्या आर्थिक वर्षामध्ये आपल्याला नागरिकांना हे नागरी सुविधा केंद्र उपलब्ध करून देता येणे शक्य आहे. त्यानंतर इमारती बांधण्यासाठी एक कोटी दहा लक्षची तरतुद आपण सुचवलेली आहे. प्रभाग विकास निधी किंवा नगरसेवक स्वेच्छा निधी याच्यामध्ये एक कोटी एक्याण्णव लाखाची तरतुद केलेली आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागामध्ये साधारण दोन लाख सत्तावीस हजार इतक्या रक्कमेची कामे तातडीची काम या प्रभाग निधीमधून आपल्याला किंवा नगरसेवक निधीमधून आपल्याला करता येणे शक्य आहे. मार्केट बांधण्यासाठी एक कोटी रूपयाची तरतुद केलेली आहे. नागरी आरोग्य केंद्रासाठी साधारण ६५ लाखाची तरतुद केलेली आहे. सार्वजनिक स्वच्छता ज्याच्यामध्ये घनकचराचे जे व्यवस्थापन आहे त्याच्यासाठी साडेसात कोटी रूपयाची तरतुद केलेली आहे. यासंबंधातील सविस्तर वर्णन आपल्या चर्चेच्या वेळी आपले विशेष कार्यअधिकारी आपल्याकडे सादर करतील. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीमध्ये दोन कोटी चौदा लाखाची तरतुद आपण केलेली आहे. त्याच्यामध्ये शाळा दुरूस्ती आणि पन्नास टक्के शिक्षकांचा पगार, फर्निचर, गणवेश, पुस्तके वाटप वगैरे गोष्टींचा समावेश आहे. दोन दुर्बल घटक आणि महिला बालकल्याण या दोन विभागासाठी पाच टक्के महसुली उत्पन्नाचा खर्च जाउन तरतुद करण्याची कायद्यामध्ये व्यवस्था आहे. त्यानुसार बावन्न लाख साठ हजार इतकी तरतुद या विभागासाठी करण्यात आलेली आहे. त्यानंतरचा महत्त्वाचा विषय वृक्षप्राधिकरणाचा आहे आणि वृक्षप्राधिकरणाची महत्त्वाची बैठक यासाठी स्वतंत्र अशी आपण बोलावली होती आणि पुढच्या वर्षीचे जे वृक्षप्राधिकरणाची संकल्पना आहे. ते पुर्ण करण्यासाठी एक कोटी एकावन्न लक्षाची तरतुद आपण सुचवलेली आहे. याबाबतचे सविस्तर डिटेल्स आपल्याला चर्चेच्या दरम्यान मिळतील. तर अशा प्रकारे हा साधारण एकशे एकाहत्तर कोटी चाळीस लक्ष ब्याण्णव हजार इतक्या रक्कमेचा आणि पाच लाख पंच्याऐंशी हजार शिल्लकी अर्थसंकल्प या सभागृहाला मी सादर करित आहे. कृपया याबाबतीत यथावकाश सविस्तर चर्चा व्हावी आणि सन्मा. सदस्य आपआपसात चर्चा करून याला निर्णायक स्वरूप देतील. अशी अपेक्षा या प्रसंगी व्यक्त करतो. आपण याठिकाणी माझे स्वागत केले आणि अर्थसंकल्प या ठिकाणी सादर झालेला आहे. याअर्थसंकल्पात ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदी आपले उत्पन्न गृहीताच्या आधारे आपण धरलेला आहे तो आधार ह्याच्यामध्ये महत्त्वाचा आहे आणि तोच खरा चर्चेचा विषय होउ शकतो. तर याबाबत सन्मा. सदस्य जी भूमिका घेतील त्या भूमिकेनुसार अर्थसंकल्पाचे धोरण ठरणार आहे. आपण सर्वांनी मला ही संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे अर्थसंकल्पाचे दोन मिनिटाचे निरूपण संपवतो. आभारी आहे.

**मोहन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी सन २००४-०५ चा जो नविन एकशे एकाहत्तर कोटी रूपयाचा जो अर्थसंकल्प या ठिकाणी ठेवलेला आहे तो मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प हा महत्त्वाचा दुवा असतो आणि अर्थसंकल्पीय वर्षामध्ये असा अर्थसंकल्प मांडणे आणि पुढील वर्षामध्ये त्याचे इम्प्लिमेंटेशन करणे या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी जी विस्तृत अशी माहिती दिली आणि विविध क्षेत्रातुन कोणत्या पद्धतीने आपल्याला असे सोर्स ऑफ इनकम मिळू शकते त्याबद्दल त्यांनी आम्हाला टिपण दिले. त्याबद्दल मी त्यांना या ठिकाणी धन्यवाद देतो आणि ह्या अर्थसंकल्पावर मागच्या वर्षीप्रमाणे चर्चा करून आपल्या अधिका-यांचे सहकार्य

आम्हाला मिळेल. अशी मी अपेक्षा आपल्याकडे व्यक्त करत आहे आणि आपण जरूर ती या ठिकाणी वाढ असेल जी वाढ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत आवश्यक बाब असेल त्याच्यावर आम्ही जरूर प्रकाशझोत टाकून ते इम्प्लिमेंटेशन करण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या अर्थसंकल्पाचे मानस जे आहे, तो शहराच्या विकास करण्याच्या दृष्टीकोनातून तो मानस लक्षात ठेवून आम्ही हा अर्थसंकल्प मंजुरीसाठी जरूर ते प्रयत्न करू असा विषय नाही की, जरूर तो प्रयत्न करू आणि हा अर्थसंकल्प मंजुरीसाठी आपल्या अधिकाऱ्यांचे सहकार्य आम्हाला मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करून आपण दिलेल्या अर्थसंकल्पाबद्दल आपल्याला शतशः धन्यवाद देवून माझे दोन शब्द या ठिकाणी समाप्त करतो.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांनी आपल्याला येथे सर्व सभासदांना जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे, सन २००४-०५ चे मुळ अर्थसंकल्प चांगले दिल्याबद्दल स्थायी समितीस सादर केलेले येत्या सोमवार पासून आपले सर्व अधिकारी सोमवार व मंगळवारी बसून निर्णय घेउन बुधवारी त्यांच्या सर्पुत करू आणि या आठवडयात स्थायी समितीच्या शिफारशीने अर्थसंकल्प मा. महासभेपुढे ठेवण्यात येईल. अशी मी आशा बाळगतो आणि सर्व अधिकारी येत्या सोमवारी आणि मंगळवारी आमच्या सोबत बसू या येथे अर्थसंकल्पावर चर्चा करू या आणि बुधवारी फायनल करू.

**याकुब कुरेशी :-**

अध्यक्ष महोदय, मला वाटते हे दोन दिवस कमी पडतील.

**मा. सभापती :-**

आपल्याला आजच्या पासून एवढे दिवस मिळालेले आहेत आणि सोमवार पासून आपल्याला चर्चा करायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, माझी आपल्याला सूचना होती, आपल्याला उद्या शुक्रवार पुर्ण दिवस मिळतोय. रविवार पुर्ण दिवस मिळतोय तर आम्ही त्यादिवशी तुम्हाला वेळ द्यायला तयार आहोत आणि पुढचे दिवस म्हणजे आपल्याला चार दिवस मिळतील. आपण डिपार्टमेंट व्हाईस तीन तीन तास द्यावे.

**मा. सभापती :-**

सोमवार आणि मंगळवारी जरी प्रत्येकाला तीन तीन तास दिले तरी आपल्याकडे पुरेसा वेळ आहे.

**याकुब कुरेशी :-**

मला वाटते, तसे होणार नाही. गेल्या वर्षी दहा दिवस अर्थसंकल्पावर चर्चा केली.

**आसिफ शेख :-**

मागच्या वेळी मॅरेथॉन चर्चा झाली होती.

**मा. सभापती :-**

आपल्याला लवकरात लवकर हे काम करायचे आहे. कारण पुढे आचार सहिंता लागणार आहे म्हणून आपल्याला हे तीन दिवसात पुर्ण करायचे आहे. नाहीतर आपल्याकडे दहा दिवस होते. पण आपल्याकडे आता सहा दिवस आहे. आपण ह्या सहा दिवसात चर्चा करू शकतो. धन्यवाद.

**प्र. सचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने मा. आयुक्त साहेबांनी वर्ष २००३-०४ चा सुधारित व २००४-०५ चा मुळ अर्थसकंल्प आज स्थायी समिती समोर सादर केलेला आहे. स्थायी समितीतर्फे मी त्यांचे आभार मानतो. सदरच्या अर्थसंकल्पावर येत्या सोमवार, मंगळवारपासून प्रत्येक खात्याशी निगडीत अशी चर्चा होणार आहे. प्रत्येक खातेप्रमुखांनी दोन दिवस कार्यालय सोडू नये. सकळी अकरापासून मॅरेथॉन अशी चर्चा होणार आहे. तसेच बुधवारी सदर अर्थसंकल्पावर फायनल चर्चा होउन बुधवारी मंजुरी देण्यात येईल. तसेच प्रत्येकाला कोणी कुठच्या वेळी हजर राहायचे त्याबद्दल शेड्युल देण्यात येईल.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेबांनी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल त्यांचे मी पुष्पगुच्छ देउन स्वागत करत आहे.

**प्रकरण क्र. २२७ :-**

सन २००३-०४ चा सुधारित व २००४-०५ चा मुळ अर्थसंकल्प मा. आयुक्त साो. मा. स्थायी समितीला सादर करतील.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.०० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**